RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

दि. 5 मार्च 2026



1929- खारेपाटण महाला येथे सोमवंशीय महार समाजाची जाहीर सभा.
1939- जत येथे संस्थानातील अस्पृश्य समाजाच्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण. संकलन प्रा. यशवंत दुपटे

गुरुवार, ०५ मार्च २०२६ | वर्ष : ६ | अंक : ६६ | दैनिक | किंमत : ₹५/-
Thursday, 05 March 2026 | Year : 6 | Issue : 66 | Daily | Rate: Rs. 5/-

# निर्भीड पत्रकार, स्पष्ट वक्ते आणि सामाजिक व राजकीय चिंतक हरपला

**नागपूर** : ज्येष्ठ पत्रकार, प्राध्यापक आणि आंबेडकरी चळवळीचे अभ्यासू भाष्यकार प्रा. रणजीत मेश्राम यांचे बुधवार, दि. 04-03-2026 रोजी सकाळी 8:15 वाजता शालिनीताई मेघे हॉस्पिटल येथे निधन झाले. ते 80 वर्षांचे होते. ते 19 सप्टेंबर 2025 पासून मस्तिष्काघातामुळे बेशुद्धावस्थेत होते. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रासह सामाजिक व राजकीय चळवळींत शोककळा पसरली असून वैचारिक पत्रकारितेचा एक सशक्त आणि निर्भीड आवाज कायमचा हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रा. मेश्राम हे आंबेडकरी विचारसरणीचे निष्ठावंत अभ्यासक व परखड भाष्यकार म्हणून ओळखले जात. सामाजिक विषमता, संविधानिक मूल्ये आणि बहुजन हक्क या विषयांवर त्यांनी सातत्याने लेखन व मार्गदर्शन केले. स्पष्टवक्तेपणा, तत्त्वनिष्ठ भूमिका आणि अभ्यासपूर्ण मांडणी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. त्यांचे शालेय शिक्षण नागपूर येथील माडेल हायस्कूल, बर्डी येथे झाले. काही काळ त्यांनी पाचपावली येथील एस.सी.एस. गर्ल्स हायस्कूलमध्ये अध्यापनाचे कार्य केले. त्यानंतर पीडब्ल्यूएस महाविद्यालयात समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून त्यांनी दीर्घकाळ सेवा बजावली. विद्यार्थ्यांमध्ये ते कडक शिस्तीचे पण प्रेरणादायी शिक्षक म्हणून लोकप्रिय होते. शोध पत्रकारितेचे नवे युग त्यांच्यामुळे नागपुरात उगवले,



असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी मूक, उपेक्षित, दलित समाजाच्या व्यथा चव्हाट्यावर मांडल्या. सर्वार्थाने दुर्लक्षित परंतु, अफलातून मानसांना त्यांनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून पुढे आणले. यातून त्यांनी समाजातील हिरेच शोधून पुढे आणले. अनेक प्रकरणे त्यांनी चव्हाट्यावर आणून अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून दिला. शासन -प्रशासनात त्यांच्या पत्रकारितेचा धाक होता, तर समाजात प्रचंड आदर होता. अध्यापन करतानाच ते पत्रकारितेत आले. भारीप बहुजन महासंघाच्या माध्यमातून राजकिय ठसा उमटविला. ते खनिकर्म महामंडळावर सदस्य होते. त्यांच्या पश्चात मुलगा प्रियदर्शन (सध्या ऑस्ट्रेलिया येथे नोकरीवर), विवाहित कन्या जुई आणि पत्नी डॉ. सविता मेश्राम (मनपाच्या माजी आरोग्य अधिकारी) असा परिवार आहे. मुलगा प्रियदर्शन हा ऑस्ट्रेलियाहून गुरुवारी सायंकाळी 7 वाजता नागपूर येथे पोहोचणार आहे. सध्या त्यांचे पार्थिव शालिनीताई मेघे हॉस्पिटल येथील मृतदेहगृहात ठेवण्यात आले आहे. शुक्रवार, दि. 6-3-2026 रोजी सकाळी 8:00 वाजता त्यांचे पार्थिव इंदोरा बुद्ध विहार (जुने निवासस्थानाजवळ) येथे अंत्यदर्शनासाठी आणण्यात येईल. सकाळी 7 ते 11 या वेळेत नागरिकांना अंत्यदर्शन घेता येईल. त्यानंतर सकाळी 11:00 वाजता वैशाली नगर स्मशान घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. वाडी येथील रजत उत्सव निवास येथे झालेल्या बैठकीनंतर ही माहिती जाहीर करण्यात आली. प्रा. रणजीत मेश्राम यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीतील एक अभ्यासू, तत्त्वनिष्ठ आणि लढाऊ विचारवंत हरपल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. भारीप बहुजन महासंघाच्या माध्यमातून राजकिय ठसा उमटविला. ते खनिकर्म महामंडळावर सदस्य होते.

## प्रख्यात पत्रकार प्रा. रणजीत मेश्राम यांचे दैनिक बहुजन सौरभचे ऋणानुबंध



प्रा. रणजीत मेश्राम यांचे दैनिक बहुजन सौरभ सोबत अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. ते दैनिकाचे नियमित लेखक असून सामाजिक, शैक्षणिक व आंबेडकरी विचारांवर त्यांनी सातत्याने परखड लेखन केले. सहकार तत्त्वावर दैनिक प्रकाशित करणे ही आंबेडकरी चळवळीची मोठी किमया असल्याचे ते नेहमी गौरवाने सांगायचे. दैनिक बहुजन सौरभच्या वर्धापनदिन कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते होते. विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने भेटीगाठी होत असताना ते नेहमीच बहुजन सौरभच्या वैचारिक वाटचालीबाबत मार्गदर्शन व सकारात्मक विचार मांडाये. बहुजन सौरभ परिवाराचे मार्गदर्शक होते. त्यांच्या निधनामुळे बहुजन सौरभ परिवारास सांस्कृतिक, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. दैनिक बहुजन सौरभ परिवाराच्या वतीने मुख्य संपादक ?ड डॉ सिद्धार्थ कांबळे, निवासी संपादक संध्या राजूरकर, कार्यकारी संपादक विलास गजभिये, सहयोगी संपादक नागेश बुरबुरे आणि सर्व संचालकांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## नागपूर कारखान्यातील स्फोटक दुर्घटना ही सरकारी अनास्थेचे बळी : विजय वडेट्टीवार

### दीड वर्षात 43 कामगारांचा मृत्यू होऊनही सरकार ढिम्म

**मुंबई** : नागपूरमधील SBL कंपनीत झालेला भीषण स्फोट आणि त्यात झालेली जीवितहानी ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक आहे. वारंवार अशा घटना घडत असतानाही सरकार केवळ घोषणाबाजी करण्यात धन्यता मानत आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत केली. यासंदर्भात त्यांनी स्थगन प्रस्ताव मांडून तातडीच्या चर्चेची मागणी केली. विधानसभेत आक्रमक पावित्रा घेत वडेट्टीवार म्हणाले की, नागपूर जिल्ह्यात अशा प्रकारचे 11 स्फोटक कारखाने आहेत. गेल्या दीड वर्षात या कारखान्यांमध्ये झालेल्या विविध स्फोटात 43 कामगारांचा मृत्यू झाला असून, त्यामध्ये 25 महिलांचा समावेश आहे. केवळ 300 रुपये मजुरीसाठी जीव धोक्यात घालून हे मजूर काम करतात, म्हणून गरिबांच्या जिवाची या सरकारला काहीच किंमत उरलेली नाही का? रविवारी सकाळी झालेल्या स्फोटात 20 मजुरांचा मृत्यू झाला आहे यात 19 महिलांचा



समावेश आहे. त्यांची कुटुंब आणि मुल उघड्यावर पडली आहेत. तुम्ही 15 लाख 50 लाख देण्याची घोषणा करतात त्याने जीव परत येणार का? असा सवाल वडेट्टीवार यांनी विधानसभेत उपस्थित केला. केंद्र आणि राज्य सरकारला वारंवार या कंपन्यांचे 'सेफ्टी ऑडिट' करण्याची विनंती करूनही कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. स्फोटक पदार्थांवर नियंत्रण ठेवणारे 'पेसो' कार्यालय अवघ्या 10 किमी अंतरावर असूनही त्यांच्याकडून गांभीर्याने तपासणी होत नाही. याबाबत अनेक तक्रारी झाल्या तरी कारवाई झालेली नाही. कारखाने निरीक्षक आणि कामगार खाते नेमके काय करत आहे? वारंवार घटना घडूनही कोणावरही कडक कारवाई का होत नाही? असे प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केले.

## महत्त्वाच्या बातम्या

### होळीनिमित्त रेल्वेबाहेर झाड वाहून नेल्याबद्दल रेल्वेने केला गुन्हा दाखल

**मुंबई** : मुंबईतील विरारहून माहीमला जाणाऱ्या लोकल ट्रेनच्या बाहेर बांधलेले एक मोठे आरके नट झाडाचे खोड सहा जणांनी वाहून नेण्याचा प्रयत्न केला. सुरक्षेच्या कारणास्तव हे बेकायदेशीर मानले गेले. रेल्वेने कारवाई करत सर्व आरोपींना अटक केली आणि रेल्वे कायद्याच्या कलम 145(ब) आणि 145(क) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

### ठाण्यात पोलिस आणि नागरिकावर हल्ला

**मुंबई** : (संगठित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत गुन्हा दाखल महाराष्ट्रातील ठाणे येथील पोलिसांनी चार जणांविरुद्ध संघटित गुन्हेगारी विरोधी कायद्याअंतर्गत (मकोका) गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यावर एका पोलिस अधिकाऱ्याला मारण्याच्या आणि जखमी करण्याच्या उद्देशाने एका व्यक्तीवर हल्ला केल्याचा आरोप आहे. बुधवारी एका पोलिस अधिकाऱ्याने ही कारवाई जाहीर केली. ही घटना 1 मार्च रोजी कळवा पूर्व परिसरात घडली. पोलिसांनी सोमवारी या प्रकरणी गुन्हा दाखल केला. आरोपींची ओळख स्वप्नील माधवानी उर्फ बाबू खरकटया, सुशील कांबळे उर्फ नाट्य भाई, बिलाल आणि राजू अशी झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्नील माधवानी आणि सुशील कांबळे आधीच ठाण्यातून हद्दपार झाले आहेत.

### पश्चिम आशियात अडकलेल्या महाराष्ट्रातील 164 पर्यटक परतले

**मुंबई** : शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्याने बुधवारी सांगितले की, पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षामुळे संयुक्त अरब अमिरातीमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील 164 पर्यटक सुखरूप घरी परतले आहेत. अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमधील वाढत्या तणावामुळे ते तिथे अडकले होते. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या परतीसाठी दोन विशेष विमानांची व्यवस्था केली होती. मंगळवारी रात्री मुंबई विमानतळावर दोन विमाने उतरली. पहिल्या विमानात 76 आणि दुसऱ्या विमानात 88 पर्यटक होते. यामध्ये पुण्याच्या इंदिरा स्कूल ऑफ बिझनेस स्टडीजमधील 84 विद्यार्थ्यांचा समावेश होता. उर्वरित ठाणे, अहिल्यानगर आणि पुण्यातील होते. मंगळवारी दुपारी युएईतील फुजैराह विमानतळावरून विमाने मुंबईला रवाना झाल्याचे शिंदे यांच्या कार्यालयाने सांगितले. एकनाथ शिंदे यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर केली. त्यांनी सांगितले की, दुबईत अडकलेल्या महाराष्ट्रातील लोकांना परत आणण्यात शिवसेनेला यश आले आहे. या कामगिरीबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले. कठीण काळात अडकलेल्या लोकांना मदत करताना त्यांना खूप समाधान मिळाल्याचे शिंदे म्हणाले.

### मध्य रेल्वेच्या होळी विशेष गाड्यांमधून चार दिवसांत 24.18 लाख ...

**मनमाड** : चार दिवसांत मध्य रेल्वेद्वारे नियमित गाड्यांव्यतिरिक्त 862 होळी विशेष गाड्या चालवल्या गेल्या. या गाड्यांमध्ये पूर्णपणे वातानुकूलित विशेष गाउटड्या, अनारक्षित विशेष गाड्या आणि देशभरातील विविध लोकप्रिय ठिकाणांसाठी वातानुकूलित, शयनयान आणि सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे असलेल्या इतर गाड्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यांतर्गत प्रवासासाठी 409 गाड्या तर गोव्यासाठी 21 गाड्या चालवल्या. होळीपूर्वी चार दिवसांत (27 फेब्रुवारी ते 02 मार्च पर्यंत) मध्य रेल्वेच्या नियमित आणि विशेष गाड्यांमधून (होळीच्या विशेष गाड्यांसह) 24.18 लाख प्रवाशांनी प्रवास केला. यामध्ये मुंबईहून सात लाख प्रवाशांचा समावेश आहे देशभरातील प्रमुख ठिकाणांना जोडण्यासाठी या विशेष गाड्यांचे काटेकोरपणे नियोजन केले. अतिरिक्त गाड्यांचे नियोजन आणि व्यवस्थापन ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ज्यासाठी माध्यमांमधील बातम्या, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, रेल्वे इंटिग्रेटेड हेल्पलाइन नंबर 139 यासारख्या सर्व माध्यमांकडून 24 तास माहिती घेतली जाते, तसेच पीआरएस सिस्टममधील प्रतीक्षा यादीतील प्रवाशांची माहिती देखील घेतली जाते.

## अमेरिका अन् इस्त्रायलच्या हल्ल्यात 1045 इराणी नागरिकांचा मृत्यू

**नवी दिल्ली** : अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत आहे. इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने दिलेल्या माहितीनुसार, आजही (बुधवारी) सकाळी इराणची राजधानी तेहरान येथे अनेक स्फोटांचे आवाज ऐकू आले. दरम्यान, इस्त्रायलने सांगितले की, इराणकडून डागण्यात आलेल्या मिसाइल हल्ल्यांमुळे त्यांना एअर डिफेन्स सिस्टम सक्रिय करावी लागली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या युद्धाबाबत प्रतिक्रिया देताना हा संघर्ष अजून काही आठवडे किंवा त्याहून अधिक काळ चालू शकतो, असे संकेत दिले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इराणमधील एका सरकारी संस्थेच्या हवाल्याने दावा केला जातोय की, अमेरिका आणि इस्त्रायलसोबत सुरू असलेल्या संघर्षात इराणमध्ये आतापर्यंत किमान 1,045 लोकांचा मृत्यू झाला आहे. फाउंडेशन ऑफ मार्टर्स अँड व्हेटरन्स अफेयर्स या संस्थेने सांगितले की, ही संख्या ओळख पटवून दफनासाठी तयार करण्यात आलेल्या मृतदेहांच्या आधारावर निश्चित करण्यात आली आहे.



इस्त्रायलने इराणच्या मिसाइल लॉन्चर आणि एका अणु संशोधन केंद्रावर हवाई हल्ले केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायल, अमेरिकन दूतावास आणि गल्फ प्रदेशातील काही भागांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमुळे ऊर्जा पुरवठा आणि हवाई उड्डाणांवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, अमेरिकेच्या संरक्षण विभाग पेंटागनने कुवैतमधील कमांड सेंटरवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात मृत्यू झालेल्या अमेरिकन आर्मी रिझर्व्हच्या चार सैनिकांची ओळख जाहीर केली आहे.

## भाजपचे 'आदिवासी कार्ड'



**नागपूर** : भारतीय जनता पक्षाने राज्यसभा निवडणूकीसाठी उमेदवारी जाहीर करत अनेकांना मोठा धक्का दिला आहे. अनेक जण उमेदवारीसाठी प्रयत्न करत असताना भाजपने मात्र आदिवासी समाजातील असलेल्या नागपुरच्या माजी महापौर माया ईवनाते यांची राज्यसभेच्या जागेसाठी उमेदवारी घोषित केली आहे. ईवनाते यांना उमेदवारी जाहीर करत भाजपने 'सोशल इंजिनिअरींग' साधण्यावर भर दिला आहे. माया ईवनाते या नागपुरच्या माजी महापौर आहेत. त्याचप्रमाणे त्यांना राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाच्या सदस्यपदी काम करण्याचादेखील अनुभव आहे. फेब्रुवारी महिन्यात झालेल्या महानगरपालिका निवडणूकीत त्यांनी प्रभाग 12 मधून 9 हजार 400 हून अधिक मताधिक्याने विजय मिळविला होता. मागील आठवड्यातच मनपाच्या अग्निशमन समितीच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती. राज्यसभेतून उमेदवारासाठी भाजपकडून मंथन सुरू असताना अचानक दोन दिवसांअगोदर ईवनाते यांना मुंबईला बोलविण्यात आले व तेथे त्यांचे नाव निश्चित झाल्याची माहिती देण्यात आली.

## मतदार यादीतील विसंगतींमुळे पश्चिम बंगालमध्ये दोन जणांनी आत्महत्या ...

**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील जलपाईगुडी आणि दक्षिण 24 परगणा जिल्ह्यांतील दोन लोकांनी मतदार यादीतील विसंगतींमुळे मानसिक ताण सहन करून आत्महत्या केल्याचा आरोप आहे, जी विशेष सघन पुनरावृत्ती (SIR) नंतर अंतिम करण्यात आली होती. एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, 44 वर्षीय रफिक अली गाजी हे बुधवारी सकाळी दक्षिण 24 परगणा येथील घोलपारा येथे त्यांच्या खोलीत



लटकलेल्या अवस्थेत आढळले. मतदार यादीत त्यांचे नाव 'त्याग' या श्रेणीत होते. यादीतील ही स्थिती पाहिल्यानंतर ते गंभीर मानसिक तणावाखाली होते, असा दावा त्यांच्या कुटुंबीयांनी केला. दुसरी घटना जलपाईगुडी शहरात घडली. 62 वर्षीय मोमो विक्रेता गौरांगा डे मंगळवारी सकाळी त्यांच्या घरातील बाथरूममध्ये मृतावस्थेत आढळला. त्यांच्या पत्नीने सांगितले की 28 फेब्रुवारी रोजी जाहीर झालेल्या अंतिम यादीत त्यांचे नाव 'काढून टाकले' गेले होते. गौरांगाने त्यांचे नाव जोडण्यासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सादर केली होती आणि सुनावणीलाही उपस्थित राहिले होते. तरीही, त्यांना वगळल्याने ते खूप अस्वस्थ झाले होते. सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने (टीएमसी) या मुद्द्यावर केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर टीका केली आहे. पक्षाने सोशल मीडियावर लिहिले की बंगालमध्ये आणखी एक दुःखद घटना घडली आहे. टीएमसीने आरोप केला की निवडणूक आयोग आणि भाजप बंगालमधील गरीब आणि खऱ्या मतदारांना मतदान करण्यापासून रोखण्यासाठी एकत्रितपणे कट रचत आहेत. पक्षाने म्हटले आहे की त्यांचे सरकार बंगालच्या जनतेसोबत उभे आहे आणि या अन्यायाशी सर्व प्रकारे लढेल. टीएमसी नेते अभिषेक बॅनर्जी यांनी 2 मार्च रोजी सांगितले की 28 फेब्रुवारीपासून राज्यात दोन लोकांचा मृत्यू झाला आहे.

## होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी

- 'होर्मुझ' बंदीने तेलाचे चटके
- होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी 20 टक्के तेल आणि वायू वाहतूक बंद
- जागतिक बाजारात तेलाचा भडका उडाला
- भारताचा 88 टक्के तेल पुरवठा धोक्यात
- शेअर बाजारातही मोठ्या पडझडीचे संकेत आहेत.

**नवी दिल्ली** : अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील वाढत्या लष्करी संघर्षात होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक बंद करण्यात आल्याने पश्चिम आशियातून इतर देशांना होणारा तेलपुरवठा खंडित होण्याची भीती वाढली आहे. त्यामुळे मंगळवारी तिसऱ्या दिवशी तेलाच्या किमतीत वाढ झाली. इराणविरोधातील अमेरिका व इस्त्रायलचे हवाई युद्ध सोमवारी वाढले. इस्त्रायलने लेबनॉनवर हल्ला केल्यानंतर इराणने आखातील देशांमधील ऊर्जा पायाभूत सुविधा आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतील तेल टँकरवर हल्ले करून प्रत्युत्तर दिले. होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्यात आली असून या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांना आग लावण्यात येईल, असा इशारा इराणने दिला आहे. इराणच्या इशाऱ्यानंतर पश्चिम आशियातून होणारा तेलपुरवठा बंद होण्याच्या भीतीने तेलाच्या किमतीचा भडका उडाला. जगातील सुमारे 20 टक्के तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. विमा कंपन्यांनी जहाजांसाठीचे त्यांचे विमाकवच रद्द केल्याने टँकर आणि कंटेनर जहाजेही हा जलमार्ग टाळत आहेत. त्याचा परिणाम तेलाच्या किमतीवर होत आहे. ब्रेंट क्रुड निर्देशांक मंगळवारी 80.89 डॉलर प्रति पिंप होता. सोमवारी




हा निर्देशांक 82.37 डॉलरपर्यंत पोहोचला होता. जानेवारी 2025 नंतरचा होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा तेलपुरवठा विस्कळीत झाल्याने भारताच्या तेलपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. भारताकडे सुमारे 10 कोटी पिंप व्यावसायिक कच्च्या तेलाचा साठा आहे. तो 40 ते 45 दिवसांसाठी काम करू शकतो, असे 'केप्लर'ने सांगितले. भारत सुमारे 88 टक्के कच्चे तेल आयात करतो. ज्यापैकी 50 टक्क्यांहून अधिक कच्चे तेल पश्चिम आशियातील देशांकडून पुरवले जाते. या तेलपुरवठ्याचा प्रवास होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होत असल्याने त्यावर परिणाम झालेला आहे. पश्चिम आशियातील कच्च्या तेलाचा पुरवठा तात्पुरत्या काळासाठी पूर्णपणे थांबला तर त्याचा तात्काळ परिणाम लॉजिस्टिक आणि किमतीवर होणार आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक जास्त काळासाठी विस्कळीत राहिली तर पुरवठ्याचे धोके तीव्र होतील, असे केप्लर येथील रिफायनिंग आणि मॉडेलिंगचे प्रमुख संशोधन विश्लेषक सुमित रिटोलिया म्हणाले.

### होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित व्यापाराचे आवाहन

पश्चिम आशियातून मोठ्या प्रमाणात तेल आणि नैसर्गिक वायूची आयात करणाऱ्या चीनने दोन्ही बाजूंना युद्ध थांबवण्याचे आवाहन केले. तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेल वाहतूक करणाऱ्या जहाजांची वाहतूक सुरक्षितपणे करू देण्याचे त्यांनी आवाहन केले. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनीही या प्रदेशातील तेलाच्या पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांबद्दल अरब नेत्यांमधील चिंता इराणला कळवल्या जातील, असे सांगितले. पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे पुतिन यांनी सांगितले.

॥ भावपुर्ण श्रध्दांजली ॥
द्वितीय पुण्यस्मरण



स्मृतिशेष
डॉ. एन.जी. खोब्रागडे
माजी वैद्यकीय अधिकारी
रा. पारडसिंगा ता. काटोल
ह. मू. सोनेगाव, नागपूर
मृत्यू : दि. ०३/०३/२०२४

धम्म प्रचारक, समाजसेवक, आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते, बुध्द विहार समन्वय समितीचे सदस्य, गरीब विद्यार्थ्यांचा आधार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहयोगी मंडळ सदस्य, नालंदा शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष

त्यांच्या सत्कार्याने त्यांनी खोब्रागडे परिवार, जन्मगाव पारडसिंगा यांचा नावलौकिक वाढवणारे-आमचे बाबा स्मृतिशेष वं. डॉ. एन.जी. खोब्रागडे यांना समस्त परिवारातर्फे

त्यांच्या व्दितीय स्मृतिदिनानिमित्त
विनम्र अभिवादन व भावपूर्ण आदरांजली!

“ आनंद हा आपल्या मनाच्या अंतरातून येतो;
तो बाहेरून शोधू नका… ”



बहुजन सौरभ **संपादकीय**

# जग पेटले आहे...

युद्धाचे सावट की लोकशाहीवर प्रहार? - भारताने सावध राहिले पाहिजे. जग पेटले आहे. इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष उग्र होत चालला आहे. या संघर्षामध्ये संयुक्त राज्य अमेरिका यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग आहे. जागतिक पातळीवर तणावाची तीव्रता इतकी वाढली आहे की 'तिसरे महायुद्ध' ही केवळ चर्चेची बाब राहिलेली नाही; ती एक भीषण शक्यता बनली आहे. परंतु भारतासाठी खरा प्रश्न बाह्य युद्धाचा नाही. खरा प्रश्न आहे, या जागतिक तणावाचा वापर देशांतर्गत सत्तेचे केंद्रीकरण आणि लोकशाही कमकुवत करण्यासाठी तर केला जाणार नाही ना? युद्ध आणि भारतीय राज्यघटना, भारतीय राज्यघटना युद्धाबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्वे देते. कलम 53 आणि कलम 73 अंतर्गत कार्यकारी सत्ता राष्ट्रपतींकडे असली, तरी प्रत्यक्ष निर्णय मंत्रिमंडळ घेतो. पण कोणतेही युद्धसदृश पाऊल संसदेच्या आर्थिक मंजुरीशिवाय शक्य नाही. कलम 352 अंतर्गत राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करण्यासाठी प्रत्यक्ष युद्ध किंवा बाह्य आक्रमण आवश्यक आहे. केवळ परदेशातील संघर्षाचा हवाला देऊन भारतात आणीबाणी लागू करता येत नाही. म्हणजेच, जर भारतावर थेट आक्रमण झाले नाही, तर लोकशाही प्रक्रिया सुरूच राहतील. निवडणुका, न्यायालयीन कामकाज, संसद, सर्व काही चालू राहिले पाहिजे. पण इतिहास सांगतो की 'राष्ट्रीय सुरक्षा' हा शब्द सत्तेला अमर्याद अधिकार देण्यासाठी वापरला गेला आहे. पेगॅसस आणि लोकशाहीवरील छुपा हल्ला, जग युद्धाच्या उंबरठ्यावर असताना, भारताने आपल्या घरात डोकावून पाहिले पाहिजे. पेगॅसस या इस्त्रायली गुप्तहेर सॉफ्टवेअरच्या वापराबाबत गंभीर आरोप झाले होते. पत्रकार, विरोधी पक्षनेते, सामाजिक कार्यकर्ते यांच्या फोनवर पाळत ठेवली गेल्याचे आरोप होते. प्रकरण भारताचे सर्वोच्च न्यायालयपर्यंत गेले. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी के. एस. पुट्टस्वामी विरुद्ध भारत संघ या ऐतिहासिक निकालात गोपनीयतेचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे घोषित केले आहे. जर राज्यसत्ता बेकायदेशीर पद्धतीने नागरिकांवर पाळत ठेवत असेल, तर तो केवळ कायदेशीर प्रश्न नाही; तो लोकशाहीवरील थेट आघात आहे. निवडणूक प्रक्रियेत जर सत्ताधाऱ्यांकडे विरोधकांच्या खासगी माहितीस प्रवेश असेल, तर निवडणूक मुक्त आणि निष्पक्ष राहते का? केसवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या निर्णयाने 'मूलभूत रचना सिद्धांत' दिला. त्यानुसार स्वतंत्र व निष्पक्ष निवडणुका ही संविधानाच्या मूलभूत रचनेचा भाग आहेत. त्यात हस्तक्षेप करणे म्हणजे संविधानालाच कमकुवत करणे होय. युद्धाचे राजकारण : जागतिक युद्धाची भीती निर्माण झाली की राष्ट्रवादाचा उन्माद वाढतो. सत्ताधारी स्वतःला राष्ट्राचे एकमेव रक्षक म्हणून सादर करतात. विरोधकांवर प्रश्न विचारण्यास बंदी घालण्याचे वातावरण तयार होते. पण भारत लोकशाही राष्ट्र आहे; तो एखाद्या पक्षाचा मालमत्ता हक्क नाही. कलम 324 अंतर्गत निवडणूक आयोग स्वतंत्र आहे. युद्धाचे कारण देऊन निवडणुका पुढे ढकलणे, माध्यमांवर निर्बंध आणणे किंवा विरोधकांना गप्प बसवणे, हे सर्व घटनात्मक मर्यादेबाहेरचे पाऊल ठरेल. आर्थिक परिणाम आणि सामान्य नागरिक इराणवर हल्ला झाला, तर तेलाचे दर वाढतील. तेल महागले की महागाई वाढते. महागाई वाढली की सर्वसामान्य माणूस होरपळतो. अशा वेळी सरकार कठोर आर्थिक निर्णय घेते आणि त्याला 'युद्धकाळातील गरज' असे नाव देते. परंतु भारतीय राज्यघटनेतील कलम 38 राज्याला सामाजिक आणि आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याचे बंधन घालते. कलम 39(ब) संसाधनांचे समान वितरण अपेक्षित धरते. युद्धाच्या नावाखाली सामान्य जनतेवर करांचा मारा आणि कॉर्पोरेट क्षेत्राला सवलती, हे संविधानाच्या आत्म्याशी विसंगत आहे. आणीबाणीची सावली : 1975 ची आणीबाणी भारत विसरलेला नाही. त्या काळात नागरिकांचे हक्क निलंबित झाले, विरोधकांना तुरुंगात टाकण्यात आले, माध्यमांवर सेन्सॉरशिप लादली गेली. 44 व्या घटनादुरुस्तीने काही संरक्षण दिले असले तरी, सत्तेची केंद्रीकरणाची प्रवृत्ती संपलेली नाही. जर उद्या जागतिक युद्धाचा हवाला देऊन इंटरनेट बंद केले गेले, माध्यमांवर अंकुश आणला गेला, तर तो लोकशाहीचा पराभव असेल. भारताची खरी ताकद : भारताची ताकद त्याच्या लष्करात आहेच; पण त्याहून मोठी ताकद त्याच्या संविधानात आहे. भारताने कोणाच्या बाजूने उभे राहायचे हा प्रश्न दुय्यम आहे. प्रथम भारताने आपल्या संविधानाच्या बाजूने ठाम उभे राहिले पाहिजे. न्यायपालिका स्वतंत्र राहिली पाहिजे. संसद सक्रिय राहिली पाहिजे. निवडणूक आयोग निष्पक्ष राहिला पाहिजे. माध्यमे निर्भय राहिली पाहिजेत. जर या संस्थाच कमकुवत झाल्या, तर बाह्य शत्रूची गरजच उरणार नाही; लोकशाही आतून कोसळेल. अंतिम इशारा, आज प्रश्न फक्त इराण आणि इस्त्रायल यांचा नाही. प्रश्न असा आहे, राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली नागरिकांचे हक्क कमी केले जातील का? गुप्तहेर तंत्रज्ञानाचा वापर राजकीय लाभासाठी केला जाईल का? युद्धाच्या वातावरणाचा उपयोग निवडणूक फायद्यासाठी केला जाईल का? जर असे झाले, तर ते युद्ध सीमारेषेवर नसून लोकशाहीच्या अंतःकरणात होईल. भारताने सावध राहिले पाहिजे. जागतिक युद्ध टाळणे आपल्या हातात नसले तरी लोकशाही वाचवणे आपल्या हातात आहे. तोफांचे आवाज कधीतरी थांबतील; पण जर संविधानाचा आवाज दाबला गेला, तर त्याचे परिणाम पिढ्यान्‌पिढ्या भोगावे लागतील. भारताने युद्ध जिंकणे महत्त्वाचे नाही, भारताने लोकशाही जिंकली पाहिजे. संविधान जिवंत राहिले, तर भारत जिवंत राहील. संविधान हरले, तर विजयही पराभवच ठरेल. ■■




# आंबेडकरी भाष्यकार

**आंबेडकरी आंदोलनाचे सुप्रसिद्ध भाष्यकार, प्रख्यात वक्ते, विचारवंत, धडाडीचे पत्रकार प्रा. रणजित मेश्राम 9 मार्च २०२६ रोजी ७९ वर्षांचे झाले असले तरी त्यांची काठी अजूनही पंचवीस वर्षाच्या तरुणासारखी ताठ होती. 1980 च्या दशकापासून मी त्यांना खूप जवळून पहात आलो आहे, वाचत आलो आहे आणि ऐकत आलो आहे. एवढेच नाही तर 1992 पासून एकाच वस्तीत (पत्रकार सहनिवास, नागपूर) एकाच इमारतीत राहात आलो आहे. भैय्या 77 वर्षांचे झाले यावर माझाच काय, कुणाचाही विश्वास बसणार नाही. त्यांचे दिवसाचे वेळापत्रक ठरले असते. मग ऊन, वारा, पाऊस असो, त्यात बदल होणे नाही. एक धडाडीचे पत्रकार आणि विचारवंत म्हणून महाराष्ट्रात त्यांची ख्याती आहे. जाहीर कार्यक्रमात त्यांनी माईक हाती घेतला की प्रेक्षकांवर गारूड घातल्यासारखे खिळवून ठेवत. त्यांची विषयाची मांडणी, त्यांची साधी, सोपी मराठी भाषा शैली, त्यांची शब्दफेक, त्यांची देहबोली सारेच अफलातून. त्यांच्या लेखणीला आणि वाणीला तलवारी सारखी प्रचंड धार. त्यांचा प्रत्येक शब्द खूप तोलून मापून असतो. वैचारिक वैऱ्याला रक्तबंबाळ करणारी त्यांची लेखणी आणि वाणी आहे.**

त्यांनी त्यांच्या पत्रकारितेचा काळ खूप गाजवला. 1980 पासून आमची ओळख. त्यांचा पत्रकारितेचा काळ खूप गाजला. त्यांची वृत्तमाला वाचण्यासाठी वाचकांच्या उड्या पडायच्या. तो काळ घरोघरी वर्तमानपत्र विकत घेऊन वाचण्याचा नव्हता. चहा टपरी, पान टपरीवर लोके पेपर वाचायचे. नागपुरात झाशी राणी चौकापलीकडे पांढरपेशा वस्तीतले लोके पेपर विकत घेऊन वाचायचे. त्या काळात झोपडपट्टीत पेपर पोहोचले नव्हते. पण लोकमतने ही जादू केली. रणजित मेश्राम, जेमिनी कडू, जगन वंजारी सारख्या पत्रकारांच्या लेखणीने तो घरोघरी पोहोचला आणि महाराष्ट्रात लोकमतने वाचक संख्येत पहिला नंबर घेतला. लोकमतचे तत्कालीन संपादक म. य. उपाख्य बाबा दळवी यांनी ही किमया घडवून आणली. लोखंडी पुलाच्या अलिकडे पेपर वाचला जात होता, तो पलिकडे नेण्याची किमया या पत्रकारांनी केली. दलित, आदिवासी, बहुजनात वर्तमानपत्र वाचले जाऊ लागले. तो खेड्यापाड्यात पोहोचला. रणजित मेश्राम यांच्याकडे क्राईम बिट होते, हे बिट त्यांनी खूप गाजवले. त्या काळात पत्रकार रणजित मेश्राम आणि छायाचित्रकार शंकर महाकाळ्कर ही जोडी खूप फेमस होती. रणजितच्या बातमीला शंकरच्या फोटोने आणखी वेटेज यायचे. रणजित मेश्राम हे सामाजिक आणि राजकीय विषयांचा सखोल अभ्यास असलेले व्यक्तित्व आहे. त्यांच्या अनेक बातम्या गाजल्या. या बातम्यांना सन्मानाचे राज्यस्तरीय शोध पत्रकारिता पुरस्कार मिळाले. भर उन्हाळ्यात 'डांगरवाडी वाहून गेली' या बातमीसाठी त्यांना सन्मानाचा भालाकार भोपटकर (पुणे) पहिला शोधपत्रकारिता पुरस्कार मिळाला. 1978 मधे पुणे येथील टिळक स्मारक भवनात पु. भा. भावे यांच्या हस्ते रणजित मेश्राम यांना हा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या या वृत्तमालेवर लोकमतने अग्रलेख लिहिला होता. त्यांच्या अनेक वृत्तमाला गाजल्या. नागपुरातील गरीब घरच्या मुलींना प्रचंड खोटी स्वप्ने दाखवून हरियाणा, पंजाब, मध्यप्रदेश, छत्तीसगड मधील थोराड प्रौढांशी लग्न लावून देणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, त्यात पैशाचा मोठा व्यवहार. ती टोळी शोधून पोलिसांनी जेरबंद केली. सोयाबीन तेलबियांना कुलथा कडधान्य सांगून कोटी कोटी रूपयांचा विक्रीकर कसा बुडवला जातो या वृत्त मालिकेसाठी त्यांना बाळासाहेब (नाशिकराव) तिरपुडे यांच्या नावाचा पहिला पत्रकारिता पुरस्कार मिळाला. 'अफलातून माणसं' या नावाने त्यांनी दहा माणसांवर लिहिलेल्या साहित्य जत्रेतील कव्हर स्टोरीज खूप गाजल्या. म. गांधींच्या मुलाला मुसलमान धर्माची दीक्षा देणारा अब्दुल्ला रामदास (पूर्वीचा रामदास रामटेके), मिल्खा सिंगला पराभूत करणारा ट्रक ड्रायव्हर मख्खनसिंग, स्मशानाच्या वस्तू विकणारा थोर शायर फरोज नक्काश (मोमीनपुरा), पोलिसांवर एक हजार केसेस टाकणारा सेवकराम दर्यानी, अजायबघर बांधणारा श्याम कांबळे, कमाल टॉकीजचा शेकडो वैशिष्ट्ये असलेला ऑपरेटर (हिटलर) जांगळे, सध्या गंगुबाई काठियावाड गाजते आहे, तशीच वैविध्य चारित्र्य असलेल्या शेवंताबाईवर 'ढळलेल्या पदराच्या अशाही कडा' या स्टोरीज खूप गाजल्या होत्या. रणजित मेश्राम यांनी क्राईम बिट गाजवल्यावर 'नागपूर विद्यापीठ' हे नवे बिट निर्माण करणारे ते पहिले पत्रकार ठरले. त्यानंतर पत्रकारितेत हे नवे बिट निर्माण झाले. पत्रकारितेतील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी तत्कालीन महापौर अटलबहादूर सिंग यांच्या पुढाकाराने रणजित मेश्राम यांचा नागरी सत्कार करण्यात आला. शब्दांचे उत्तम योजन, छोटी छोटी वाक्ये, प्रस्तुतीचे सामर्थ्य ही त्यांची गुणवैशिष्ट्ये आहेत. भाषाशैलीही त्याच पद्धतीची आहे. ती प्रेक्षकांना, वाचकांना खिळवून ठेवते.

लोकमतचे तत्कालीन वार्ताहर युधिष्ठिर जोशी यांची 'दंगलीचा अपंग चेहरा' ही वृत्तकथा आवडली. म्हणून 1976 मधे संपादकाच्या नावाने पत्र टाकले आणि तेच निमित्त झाले व पत्रकारितेचा प्रारंभ झाला असे त्यांनी सांगितले. 'उत्तर नागपुरातील आंबेडकर रोड .... लकवा मारलेला रस्ता' ही माझी पहिली बातमी होती, ती गाजली आणि पुढे भरपूर लिखाण, चौफेर लेखन केले अशी आठवण ते सांगतात. अष्टपैलू व्यक्तित्वाचे धनी असलेल्या रणजित मेश्राम यांना साहित्य, समाजकारणासोबत राजकारणाची ही गोडी आहे. ते सुरूवातीच्या काळात खोरिपशी जुळले होते. नंतर भारिप-बमसंशी जुळले, प्रदेशाध्यक्ष झाले, काही काळ खनिकर्म महामंडळाचे अध्यक्षपद भुषविले. परंतु अशा गुणी माणसाला नेतृत्वाला सांभाळता आले नाही. त्यांना आमदार, खासदार म्हणून संधी मिळाली असती तर तोही प्रांत त्यांनी दणाणून टाकला असता. शिक्षक आणि प्राध्यापक हा पेशाही त्यांनी गाजवला. ते विद्यार्थीचे आवडते शिक्षक-प्राध्यापक होते. असे आमचे गुणी दादा, हा त्यांचा प्रवास दि. 4 मार्च 2026 रोजी थांबला. त्यांच्या स्मृतिंना विनम्र अभिवादन! ■■



जयंत नरांजे
मो. 9960388704

# आचार्य दीनबंधू गुरुजी : धम्म चळवळीचे दीपस्तंभ...!




आचार्य दीनबंधू गुरुजी शेगावकर महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक, बुद्ध धम्माचे गाढे अभ्यासक, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे संदेशवाहक, धम्माचा प्रचार प्रसार करण्यासाठी विविध आयुधांचा वापर करणारे अष्टपैलू व्यक्तित्व होते. त्यांचा जन्म 3 मार्च, 1926 रोजी त्यांच्या आजोळी दिग्रस खुर्द येथे झाला. त्यांचे मूळ गाव अकोल्यावरून 15 किलोमीटर अंतरावर असलेले गोरेगाव बुद्रूक असून त्यांचे मूळ नाव सुपिनाथ अंबुजी शेगावकर होते. 2026 हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष, त्यानिमित्त त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

**आचार्य दीनबंधू यांचा शिक्षण प्रवास :-** गोरेगावच्या शेगावकर कुटुंबाचा परिवार मोठा असून सुपिनाथ शेगावकर यांचे मोठेबा राघोजी त्या काळात म्हणजे 1905 मध्ये 9 व्या वर्गापर्यंत शिकले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व हरहुन्नरी होते. ते कीर्तनकार, निष्णात सुतार, ग्रंथवाचक, कवी, चित्रकार तर होतेच, पण त्यांना बागकामाचीही आवड होती. त्यांच्या आणि आईवडिलांच्या संस्कारातून सुपिनाथ यांना शिक्षणाची आवड निर्माण झाली होती, त्यामुळे त्यांनी शाळेत नाव दाखल करून 1939 साली चौथीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर 1941 साली सातवीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना 1945 मध्ये अकोला जिल्हा लोकल बोर्डातर्फे शिक्षकाची नोकरी मिळाली. पुढे, ते पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेऊन उच्च शिक्षित झाले.

**दीनबंधू गुरुजींचा साहित्य प्रवास :-** दीनबंधू गुरुजींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आणि तथागत बुद्धाच्या तत्त्वज्ञानावर 1945 पासून क्रांतीकारक गीतरचना लिहायला प्रारंभ केला आणि त्यांची पहिली उद्धार ही पुस्तिका 1950 साली प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्यांनी भीम पाळणा पोवाडा, दलित जागृती, समाज चेतावणी, भीमभजन माला, आई, मी भीम होईन, निळा झेंडा, बुद्ध भजनावली, भीमपदी श्रद्धांजली, बुद्धाचा धर्म घेतला, क्रांतीची ललकार, मुकुंद श्रद्धांजली, भीम जन्मकथा, संगीत अशोक विजय नाटक, बौद्ध नित्य पूजापाठ, अभंग प्रकाश, बौद्ध विवाह विधी, बौद्ध हुंकार, धम्मचक्र प्रवर्तन सुत्त, पौर्णिमा, भीमवंस ग्रंथ, संघमित्रा नाटिका, हंस कुणाचा?, भगवान बुद्ध हिंदू होते काय? हेच द्या वरदान, धम्म उपासक संघ, बौद्ध विवाह व कायदा, असा हा धम्म, मध्यम मार्ग भाग एक, पंचशील सांभाळ, शूद्र कोण? अस्पृश्य कोण? महायान कारिका, अष्टांगिक मार्ग, त्रिशरणाच्या पद्धती, बुद्धोत्तर धम्म इतिहास, त्रिशरण आणि रजनीशांचा उलटा क्रम, गाथा धम्माची, आनापान समाधी, सम्यक समाधी, बुद्ध, भीम, धम्म पाळणा पोवाडा, धम्मोदय पाठशाळा मार्गदर्शिका अशी अनेकविध ग्रंथसंपदा 1999 पर्यंत अविरत त्यांच्या लेखणीतून साकार केली.

**अष्टपैलू व्यक्तित्व :-** आचार्य दिनबंधू शेगावकर गुरुजींनी बुद्धाच्या धर्माचा अभ्यास केला, त्यावर चिंतन करून समजून घेतला आणि तोच समस्त मानवांच्या उत्थानाचा मार्ग आहे हे जाणून त्यांनी तो समाजात रुजावा यासाठी कष्ट उपसले. त्यांचा अभ्यास व त्यांची साहित्य निर्मिती अजोड आहे. त्यांच्या कार्याची व साहित्यनिर्मितीची दखल घेऊन 1992 साली त्यांना महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री रामराव आदिक यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरवण्यात आले होते. आचार्य दीनबंधू गुरुजी हे महाराष्ट्रातील प्रख्यात कवी, ख्यातनाम लेखक, उत्कृष्ट वक्ते, नाटककार, धम्माचे प्रचारक, आंबेडकरी साहित्यिक, संपादक, प्रकाशक तसेच दीर्घकाळपर्यंत भारतीय बौद्ध महासभा अकोला जिल्हा शाखेचे अध्यक्ष होते. त्यांनी आपली शिक्षकाची नोकरी निष्ठेने तर केलीच, पण त्याचसोबत स्वतःला आंबेडकरी चळवळीत झोकून देऊन समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उत्थानासाठी आपल्या सर्व शक्ती व गुणांचा वापर केला.

**धम्म दीक्षेचे साक्षीदार :-** 14 ऑक्टोबर, 1956 रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन आपल्या पाच लाख अनुयायांना दीक्षा दिली. त्या धम्मदीक्षेत आचार्य दीनबंधू गुरुजी सहभागी झाले होते. तो दैदिप्यमान समारंभ पाहून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रत्यक्ष ऐकून ते खूप प्रभावित झाले होते. हा आनंद त्यांनी 'आज तोडीले गुलामीचे बंध, आज विजयाचा आनंदकंद, जुन्या धर्माचे केले खंड खंड, नव्या धर्माचा नवानवा छंद, थेंब थेंब रक्ताचा आज चेतला, आज आम्ही बुद्धाचा धम्म घेतला...!' या गीतातून व्यक्त केला.

**हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व :-** आचार्य दीनबंधू गुरुजी हरहुन्नरी होते. त्यांनी नाटके, नाटिका, भीमगायन मंडळे, कलापथक मंडळ स्थापन करून समाज जागृतीचे कार्य केले. ते स्वतः कलापथकात भूमिका करायचे. स्वतःची पुस्तके पदरमोड करून छापण्यासाठी त्यांनी सम्यक मुद्रण छापखाना सुरू केला होता. तसेच 1961 पासून तथागत नावाचे मासिक चालविले. समाजात आंबेडकरी विचार व बुद्ध धम्माचा प्रचार प्रसार करून धम्म संस्कार रुजावे यासाठी त्यांनी विविध आयुधांचा वापर केला. विवाह विधी लावणे, छोट्या छोट्या पुस्तिका छापणे व वितरीत केल्या, भाषणे देऊन धम्म संस्काराचे कार्य केले. म्हणूनच ते धम्म चळवळीचे दीपस्तंभ ठरले.

**दीनबंधू गुरुजींचा गौरव :-** आचार्य दीनबंधू गुरुजी शेगावकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे बंधू तमिळनाडू राज्याचे प्रधान सचिव म्हणून सेवानिवृत्त झालेले आय.ए.एस. अधिकारी आदरणीय विश्वनाथ शेगावकर आणि ज्येष्ठ कवी, आंबेडकरी विचारवंत, सुप्रसिद्ध साहित्यिक आदरणीय आ. कि. सोनोने यांनी 2021 मध्ये 'दीनबंधू - धम्मज्ञान महामेरू' हा ग्रंथ संपादित केला. त्या ग्रंथात विविध मान्यवरांनी आचार्य दीनबंधू यांची थोरवी वर्णन करणारे लेख लिहिले, त्यात त्यांना सामाजिक व धम्मिक चळवळीचा दीपस्तंभ, चिवट वृत्तीचे संशोधक, आंबेडकरवादी साहित्य संपदेतील मानबिंदू, आंबेडकरवादी कवींचे कुलगुरू, समर्पित आंबेडकरी विचारवंत, आंबेडकरी सिद्धांताचे सिद्धहस्त भाष्यकार, प्रकाशाचे बियाणे, क्रांतीकारक कवी, धम्म संस्काराचे चालते बोलते विद्यापीठ, धम्म सेनानी, आंबेडकरी संस्कृतीचा शिलेदार, शीलवान विचारवंत असा विविधांगी गौरव केला आहे. अशा या विविध गुणांनी युक्त आणि अजातशत्रू असलेल्या दीनबंधू गुरुजींनी 26 डिसेंबर, 2000 रोजी जगाचा निरोप घेतला मात्र आजही त्यांचे वैचारिक अस्तित्व मनामनात कायम आहे. त्यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त त्यांना कोटी कोटी प्रणाम.

जयभीम, अत्त दीप भव...! ■■



प्रा. डॉ. एम. आर. इंगळे
मो. 9423429060

# जनार्दन वाघमारे यांना कृतज्ञतांजली




डॉ. जनार्दन वाघमारे यांचा 2 मार्च 2026 ला देहान्त झाला. त्यांच्या बौद्धिक आणि भावनिक निर्मितीमधील मनान्त कधीही होणार नाही. उलट हे विचार झालेले मन आता अधिकच अन्वर्थक होत लोकांना शहाणीव वाटत राहील. त्यांचे असणे आता देहाचे नसेल पण त्यांचे असणे यापुढे त्यांच्या सदुसष्ट ग्रंथांचे असणे असेल.

डॉ. जनार्दन वाघमारे नावाचे आंतरराष्ट्रीय ज्ञानपीठ कालपर्यंत लातूर नावाच्या गावात मुक्कामी होते. वाघमारे वैश्विक परिप्रेक्ष्यात विचार करीत होते. 'स्वायत्त' माणूस अजिंक्य व्हावा यासाठी त्यांनी सुसभ्य विचारवास्तूचे भव्य बांधकाम केले. यामागे फुले-शाहू आंबेडकरांचे महान लॉजिक उभे आहे. डॉ. वाघमारे इंग्रजीचे प्राध्यापक होते. ते पुढे प्राचार्य झाले. कुलगुरू झाले. राज्यसभेचे सदस्य झाले, पण वाघमारे या पदांमुळे मोठे झाले नाहीत, तर वाघमारे यांनीच या सर्व पदांना मोठे केले. त्यांचा लातूर पॅटर्न जितका मोलाचा आहे त्याहून कितीतरी पटीने त्यांनी केलेला फुले-शाहू-आंबेडकर समाजाच्या पॅटर्नचा पाठपुरावा मोलाचा आहे. साहित्य, समाज, शिक्षण, राजकारण, प्रशासन अशा सर्वच क्षेत्रांच्या हातात परिवर्तनाचे बॅनर्स देणारा हा विचारवंत प्रकृतीने पूर्ण बंडखोरच आहे. त्यांनी अन्यायाची मनुस्मृती जाळणारे सत्य लिहिले. त्यांनी अविचार उद्ध्वस्त करणारा विचार लिहिला. समरसतेवर फुल्या मारून त्यांनी समतेचा कार्यक्रम लिहिला. निरामय उजेड हेच त्यांच्या विराट चर्चाविश्वाचे प्रणाणशास्त्र आहे. आपल्याकडे जातींचा रोग नसता तर महाराष्ट्राने त्यांना अग्रगण्य विचारवंत मानले असते.

**अमेरिकन निग्रो :-** 'साहित्य आणि संस्कृती' हे त्यांचे पहिले पुस्तक! ते मी झपाटलेल्या मनाने वाचले. या पुस्तकाने मला जगातील ज्वालामुखी पाहणारे डोळे दिले. पुढे त्यांच्यासोबत मुंबई, सातारा, सुरत, अशा अनेक ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये भाषणे दिली. मी त्यांच्या लहान भावासारखा पण त्यांनी यशवंत मनोहर प्रतिष्ठानचा पुरस्कार मोठ्या मनाने स्वीकारला. माझ्या इंग्रजी आणि मराठी अशा दोन कवितासंग्रहांना त्यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिल्या. इतरही दोनतीन लेख माझ्या साहित्यावर लिहिले. काटोलच्या कार्यक्रमासाठी आले असताना नागपूरच्या घरी आमच्यासोबत जेवण केले. 'सत्ता, समाज आणि संस्कृती' हे त्यांचे मौलिक पुस्तक त्यांनी मला अर्पण केले. या त्यांच्या निरपेक्ष प्रेमाने मला समृद्धही केले आणि विनम्रही केले. जीवनाचे अनिवार्य आणि कटू सत्य सांगण्यासाठी जीवनाला त्यांनी त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक क्षणाचा हिशेब दिला. या सुसंस्कृत ज्ञानअर्हताला विनम्र कृतज्ञतांजली! ■■



यशवंत मनोहर

# मोजक्या शब्दात आंबेडकरी विचारांची पेरणी करणारा अभ्यासक हरपला

उठा भैया उठा! तुमच्या विचारांच्या पायवाटेने जातांना आम्ही वैचारीक महामार्ग शोधतो आहोत. आमची तुमच्यासाठी त्रिवार प्रार्थना. आमचे स्नेही केवल जीवनतारे यांच्या फेसबुकवर काल परवा रणजीत मेश्राम यांच्या वाढदिवशी मी भावना व्यक्त केल्या होत्या. मोजक्या शब्दात आंबेडकरी विचारांची पेरणी करीत बहुजन युवा जागृत करण्याचे मोठे काम रणजीत भैया आपण केले. आपले हळूवारपणे स्पष्ट बोलणे, मरगळलेल्या मनाना नवउर्जा देत, सत्यविचारांची पाऊलवाट दाखवत, आंबेडकरी विचारांचाच नाही तर संत-महापुरूषांच्या विचारांचा महामार्ग दाखवायचे. आपल्या भूमिका मिळमिळीत कधीच नव्हत्या. एखाद्याला आपल्या बोलण्याचा अर्थ कळला नसेल, त्याच्या चिडण्याला आपण सहज शब्दातून सत्यता पटवून देण्याचे आपले कसब भल्याभल्या पंडीतांना कधी जमले नाही. एखाद्या विषयावर पाल्हाळ लिहणारे, रकाने भरविणारे, शब्दप्रभु पांडित्याचे प्रदर्शन दाखविणारे आम्ही रोज बघतो. पण मोजक्या शब्दात भला मोठा विषय मांडून त्या विषयाचे आकलन वाचकांना होईल याचा आत्मविश्वास आपल्या दमदार लेखणीत होता. वक्तृत्व आणि लेखनीचे धनी आपण होता. रणजीत भैया खुप कार्यक्रमात आपल्या सोबतीला बसलो. खुपदा तुम्हाला ऐकले, खुपदा प्रवास सोबतीला केला, तरीपण तुमच्या विद्वतेचा सखोल थांगपत्ता कधीच लागला नाही. तुमची दुःखी कष्टी मानवी समुहाची जाण भल्याभल्यांना गवसत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शब्द आणि भगवान बुद्धांची करूणा यांचा संगम तुमच्या जगण्यात होता. अन्यायाची चीड व्यक्त करतांना हजारोंचा मानवी समूह तुमच्या शब्दाने भारावून जायचा. आपण अनेक तरूणांच्या नवजीवनाचे उर्जाकेंद्र होता. रणजीत भैया जीवनाच निर्वाण प्रत्येकाच होणार आहे. पण आपण अनेक दिवस कुठल्या साधनेत स्थीतप्रज्ञ होता आम्हाला कळलेच नाही. रोजची आमची प्रार्थना तुम्ही वांझ ठरवली. आपले निर्वाणप्रस्थ आपणच ठरवत आम्हाला अश्रूंच्या सागरात डूबवत ठेवले. त्रिवार वंदन मित्रा!

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शब्दात -

विधाता मृत्यु हो ऐसी । हजारो लोग रोते हो ।
सफल हो जिन्दगी सचकी । किर्ती घर-घर में गाते हो ॥
किया हो काम गरीबोंका । दुआँ सबसे बडी उनकी ।
मिला हो प्रेम सेवाका । प्रेमी दिलमनसे भाते हो ॥
कहे जनता न मरने दो । उसी मरने मे हासिल है ।
जरा भी दुःख ना दिलपर । यही अचरजकी बाते हो ॥ ■■

- ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक
अभ्यासक राष्ट्रसंत तुकडोजी विचारधारा

# आठवणीतले बाबा

4 मार्च तुमचा पाचवा स्मृतिदिन. 4 मार्च 2021 रोजी तुम्ही आम्हाला पोरक करून गेला. परंतु आजही तुम्ही सांगितलेल्या मार्गावर आम्ही मार्गक्रमण करून सुखी जीवन जगत आहोत. बाबा तुमचा जन्म दाभाडा या अमरावती जिल्ह्यातल्या छोट्याशा गावातला. लग्नानंतर तुम्ही धोत्रा रेल्वे या गावी पोट भरण्यासाठी म्हणून आलात. सुरुवातीला गायी राखणे, हाताला जी काम येतील ती करणे आणि आपला परिवार सांभाळणे यामध्ये तुम्ही आपले आयुष्य जगत होता. परंतु तुमच्या मोठ्या मुलाच्या अचानक मृत्यूमुळे तुमच्या आयुष्यामध्ये खूप मोठी पोकळी निर्माण झाली. यातून बाहेर पडण्यासाठी तुमच्या इंजिनियर असलेल्या मून मामाने तुम्हाला वर्धेला एका अधिकाऱ्याच्या बंगल्यावर काम मिळवून दिले. तिथे तुम्ही अगदी प्रामाणिकपणे आणि मेहनतीने काम केले. या कामावर खुश होऊन तुम्हाला त्या अधिकाऱ्यांनी पीडब्ल्यूडी डिपार्टमेंटमध्ये शिपाई या पदावर तुमची नियुक्ती केली. या काळामध्ये तुम्ही धोत्रा रेल्वे ते वर्धा असे रोज पंधरा ते वीस किलोमीटर सायकलने ये जा करीत होते. काही काळानंतर तुम्हाला असे जाणवले की आपण आपले भविष्य वर्धेला स्थलांतरित होऊनच निर्माण करू शकतो. अशावेळी आजी-आजोबांनी तुम्हाला विरोध केला तू शहरात जाऊन तुझ्या चार मुली, त्यांचे संगोपन कसे करशील? असे त्यावेळी आजोबांना वाटत होते. तरी तुम्ही आपल्या निर्णयावर ठाम राहिलात आणि वर्धेला स्थलांतरित झाले. सिव्हिल लाईन क्वार्टर, वर्धा येथे आपल्या आयुष्याचे जवळपास 25 ते 30 वर्ष या एकाच क्वार्टरमध्ये काढले. या कालावधीमध्ये तुम्ही तुमच्या तुटपुंज्या पगारामध्ये कुटुंबाचे पालन पोषण होऊ शकत नाही म्हणून आपल्या परिवाराला हातभार लावण्यासाठी नोकरी करून राहिलेल्या वेळेत सकाळी उठून घरच्या गाईचे दूध काढून ते कॉलनी मधील लोकांच्या घरी पोहचवणे, सुट्टीच्या दिवशी गावाला दुसऱ्यांची शेती करणे, नंतर तीच शेती स्वतः विकत घेऊन त्यातून योग्य तो शेतीमाल तयार करणे व आलेल्या मिळकतीतून वर्षभराचे धान्य घेऊन ठेवणे. तसेच प्लॉटचे काम यामधून जी काही मिळकत होत होती त्यातून आपल्या परिवाराचा खर्च भागवणे ही सगळी तारेवरची कसरत तुम्ही तुमच्या परिवाराला एक चांगले जीवन देण्यासाठी करत होता. तुमच्या दुसऱ्यांना मदत करण्याच्या स्वभावामुळे कितीतरी लोकांचे आयुष्य तुम्ही मार्गी लावले. यामध्ये आर्थिक मदत तसेच कुणाच्याही अडीअडचणीला धावून जाणे. या तुमच्या गुणामुळे तुम्ही नातेवाईक व मित्रपरिवार यांना आपलेसे केले. व मित्रपरिवार व नातेवाईक यांना कुठलीही गरज पडल्यास आणि अडचणीच्या वेळी धावून जाणे याच गुणामुळे तुम्ही कितीतरी जणांना मदत केली. वर्धेला स्थलांतरित होण्याच्या या एका निर्णयामुळे आमचे जीवन सुद्धा एका चांगल्या मार्गाला लागले. त्यानंतर तुम्ही आपल्या मुलींना उच्च शिक्षण देण्यासाठी खूप मेहनत केली. तुमचे कष्ट, मेहनत, त्याग आणि आम्हाला मोठे करताना केलेली उत्तम मॅनेजमेंट. या सर्वांमुळेच आज आम्हाला सुखाचे दिवस बघायला मिळाले आहे. बाबा तुम्ही आम्हाला लहानपणापासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुद्ध धम्माचे संस्कार आमच्यावर केले. चारही मुलींचे लग्न झाल्यानंतर तुम्ही तुमचे आयुष्य भंतेजीच्या सहवासात घालवले. यामध्ये बौद्ध स्थळांना भेटी देणे, धम्म शिबीर करणे तसेच आंतरराष्ट्रीय बौद्ध स्थळे जसे की श्रीलंका, म्यानमार, नेपाळ, थायलंड या सर्व देशांना तुम्ही भेटी दिल्या. बाबा, आम्हाला आज समाजामध्ये जो मानसन्मान मिळतो आहे त्यामागे तुमचे मार्गदर्शन आणि आयुष्यात बुद्ध धर्माचे काय महत्त्व आहे हे तुम्ही तुमच्या जीवनातून आम्हाला पटवून दिले. धम्माचा मार्ग अवलंबल्यास आपले आयुष्य किती सुखकारक होऊ शकते याचे उदाहरण म्हणजे तुम्ही आयुष्यामध्ये जीवन जगताना येणाऱ्या सुखदुःखामध्ये स्वतःला या दुःखामधून कसे बाहेर निघायचे यासाठी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन.

तुमचे व्यक्तिमत्व म्हणजे एक कष्टाळू मेहनती सुस्वभावी सहनशील आणि उत्तम नियोजक. तुमचे जीवन म्हणजे अत्यंत कठीण, दयनीय बिकट परिस्थिती आणि संघर्ष. यामधून सुद्धा तुम्ही आपल्या परिवाराला योग्य दिशा देण्याचा पूर्ण प्रयत्न केला आणि त्यामध्ये यशस्वी सुद्धा झाला. आपल्या चारही मुलींना योग्य शिक्षण आणि उच्च शिक्षण मिळावे यासाठी जीवतोड मेहनत केली आणि त्याचे फळ म्हणजे आज तुमच्या मुली एक उत्तम आयुष्य जगत आहेत. ज्यावेळी तुम्ही वर्धेला पीडब्ल्यूडी डिपार्टमेंटमध्ये एक चतुर्थ कर्मचारी म्हणून नोकरी करीत होता, त्यावेळी तुम्हाला जे अनुभव आले. तेव्हाच तुम्ही ठरवले की मी माझ्या मुलींना अधिकारी बनवणार. त्यावेळी जे तुमच्या मनामध्ये एक अधिकारी त्याचे जीवन कसे असते आणि माझ्या मुलींनी सुद्धा अधिकारी व्हावे ही प्रेरणा तुम्ही आम्हाला दिली. जीवन जगताना आयुष्यामध्ये बरेच चढउतार येत असतात आणि त्यातून मार्ग कसा काढावा हे आम्ही तुमच्या अनुभवातून शिकलो आहोत. तुम्ही ज्या संघर्षातून स्वतःची आणि कुटुंबाचा प्रगती केली ते खरेच विलक्षण आहे. एक अशिक्षित व्यक्ती जेव्हा आपल्या मुलींना सुशिक्षित करतो त्यासाठी लागणारे कष्ट आणि समाजामध्ये एक आदर्श निर्माण करतो. याचे तुम्ही एक उत्तम उदाहरण होते. तुम्ही समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. आज तुम्ही आमच्यात नाही. परंतु तुमचे व्यक्तिमत्व आजही आम्हाला सतत आठवत असते, नातवंडावर प्रेम करणारी आजोबा आपल्या चारी मुलींवर उत्तम संस्कार करणारे वडील. आम्ही पाहिलेले तुमचे पती-पत्नीचे आदर्श नाते. त्यातून आम्ही खूप काही शिकलो. एक आदर्श पती-पत्नीचे नात कसे असते हे तुम्ही आम्हाला तुमच्या अनुभवातून अनुभवता आले. तुमच्या सु-स्वभावी स्वभावामुळे तुम्ही जो मित्रमंडळी नातेवाईक यांचा गोतावळा तयार केला होता तो आजही जपण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहे. तुम्ही सांगितलेली जीवनमूल्य आजही आम्हाला मार्गदर्शक आहे. धम्माच्या मार्गावर चालल्यानंतर आपल्या आयुष्यात काय बदल होतो हे आम्ही तुमच्यामध्ये बघितले आहे. तुमचे अनुभव आम्हाला नेहमीच मार्गदर्शन करीत आहेत. जरी तुम्ही आज आमच्यामध्ये शरीररुपाने नाही तरी तुम्ही सांगितलेली जीवन तत्वे आम्हाला सतत योग्य मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करत असतात. आठवणीतले बाबा या पुस्तक रूपाने तुम्ही आमच्या नेहमीसाठी स्मरणात राहणार. तुमच्या 5 व्या स्मृतिदिनघी विनम्र अभिवादन! ■■






डॉ. सूर्यकांता पाटील
मो. 9923338047

“ जो शिकत राहतो तोच आयुष्यात मोठा होतो... ”



# रणजित मेश्राम चळवळीतील बुलंद आवाज



आंबेडकरी चळवळीला अनेक चेहरे लाभले. काही मैदानात झळकले. काही लेखणीतून पेटले. काहींनी आपल्या शांत, एकनिष्ठ उपस्थितीतून चळवळीचा आत्मा जपला. रणजित मेश्राम हे त्यातलेच एक होते. आवाज मोठा होता. पण अहंकार नव्हता. भूमिका ठाम होती. पण माणुसकी मृदू होती. चळवळीच्या स्मरणात कायम राहणारी एक चालती-बोलती व्यक्ती होती.

इंदोरा हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला. त्या मातीला संघर्षाची पार्श्वभूमी आहे. संघटनेची शिस्त आहे. स्वाभिमानाची धार आहे. इंदोऱ्यातील प्रत्येक घर, प्रत्येक चेहरा चळवळीशी नाळ जोडलेला आहे. विद्यार्थी दशेतच रणजित मेश्राम या प्रवाहात मिसळले. इंदोरा हा केवळ परिसर नव्हता. तो कार्यकर्ते घडविणारा कारखाना होता. त्यातून तावून-सुलाखून बाहेर पडलेले रणजित मेश्राम एक होते. रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशनमध्ये विविध पदांवर काम करताना ते अधिकच परिपक्व झाले. रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशनमध्ये त्यांनी संघटन कौशल्य, वैचारिक बांधिलकी आणि शिस्त यांची सांगड घातली. चळवळीत असतानाच शिक्षक पेशाकडे वळणे हा त्यांचा जाणीवपूर्वक घेतलेला निर्णय होता. लष्करीबागेतील गर्ल्स हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून रुजू होताना त्यांनी ज्ञानदानाला संघर्षाची जोड दिली. वर्गात पुस्तक आणि बाहेर वास्तव दोन्हींचा मेळ साधत कार्यरत राहिले. वडिलाचे लवकर निधन झाले. आईने सर्व मुलांचा सांभाळ केला. त्यांनी समाजासोबतच विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्नांची मशाल पेटवली. पुढे पी. डब्ल्यू. एस. कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून काम करू लागले. तेव्हा त्यांचा व्यासंग अधिक विस्तारला. तरीही पत्रकारितेचा धागा त्यांनी कधी तुटू दिला नाही. पत्रकारितेत रणजित मेश्राम हे स्वतंत्र अध्याय होते. लोकमत सोबत त्यांचा दीर्घ सहवास जुळला. तेव्हाचा काळ वेगळा होता. संगणक नव्हते, कागद आणि पेन होते. वेग नव्हता, पण वजनदार शब्द होते. रणजित शब्दांभोवती फिरत. एक-एक शब्द विचाराअंती लिहीत. बातमी तयार झाली की गप्पा रंगत. त्या गप्पांतूनच पुढील बातमीचा बीजांकूर फुटे. क्राईम हा त्यांचा आवडता बीट. विद्यापीठ बीटही त्यांनी समर्थपणे सांभाळला. पण त्यांच्या क्राईम बातम्यांनीच सर्वाधिक गाजवले. त्या कामगिरीची दखल म्हणून त्यांना भालाकार भोपटकर पुरस्कार मिळाला. तो सन्मान त्यांच्या प्रामाणिक परिश्रमांचा होता. उत्तर नागपूर त्यांना मुळापासून ठाऊक. त्या भागाचा विस्तार त्यांनी जवळून पाहिला. बिडी कामगार, मिल कामगार, लाईनमन, गँगमन अशी कामे करणाऱ्यांची वस्ती. तेथील माणसे मोठी होतांना, घडतांना पाहिली. वकील, अभियंते, डॉक्टर, लेखक, न्यायाधीश, प्राचार्य अनेकांचे आयुष्य त्यांच्या साक्षीने उभे राहिले. एकेकाळी रात्रीचे आठ वाजले की जिथे रिक्षेवालेही जात नव्हते. तिथे रणजित नावाचा अवलिया निर्भयपणे ये-जा करत असे. पत्रकारिता ही त्यांच्यासाठी नोकरी नव्हती. ती समाजाशी असलेली बांधिलकी होती. त्यांनी निवडणूक लढविण्याचा प्रयत्न केला. उमेदवारी अर्ज दाखल केला. दोन दिवसांनी मागे घेतला. सत्ता नव्हे, तर सत्य हेच त्यांचे राजकारण राहिले. ते खनिकर्म महामंडळाचे अध्यक्ष झाले. राज्यमंत्र्यांचा दर्जा होता. लाल दिव्याची गाडी होती. ती त्यांनी कधी मिरवली नाही. पत्रकार सहनिवासाच्या आंत कधी दिसली नाही. फाटकाच्या बाहेरच पार्क करीत. राजकीय अस्थिरतेत ती फार काळ टिकली नाही. हा भाग वेगळा. त्या गाडीचा तोरा त्यांनी कधी दाखविला नाही. एखादी घटना मनाविरूध्द घडली की संताप व्यक्त करीत. काही क्षणातच असे काही घडले हे विसरून जात. ते प्रभावी वक्ते होते. त्यांची रिपब्लिकन पक्षाशी नाळ जोडलेली होती. ती शेवटपर्यंत कायम राखली. टेबलापेक्षा ते चहाच्या टपरीवर अधिक खुलत. चहाच्या गरम घोटासोबत जुन्या आठवणी उलगडत; आता तुमच्याकडे साधने आहेत. आमची सायकल पत्रकारिता होती, असे म्हणत ते हलकेच चिमटे काढत.

आता मी जातो...!

किस्से सांगताना वेळेचे भान हरपत. मग अचानक म्हणत तुम्ही जा! तुमचे काम बाकी आहे. माझे काम झाले. आता मी निघतो....! गेल्या काही महिन्यांत ते मौनात गेले. हॉस्पिटलमध्ये भेट झाली. डोळ्यांत ओळख होती. पण शब्द हरवले होते. कदाचित शब्दांनीही विश्रांती घेतली होती. त्यामुळेच त्यांनी 'आता मी जातो' असा निरोप न घेताच प्रस्थान केले. ते कायमचेच.. न भेटण्यासाठी... बुद्धचरणी विलीन होण्यासाठी. त्यांच्या जाण्याने एक पोकळी निर्माण झाली. चळवळीच्या सभेतला एक बुलंद आवाज अचानक थांबला. रणजित मेश्राम हे शिक्षक, पत्रकार कार्यकर्ता म्हणून वावरले. ते आंबेडकरी चळवळीत अखेरपर्यंत सक्रीय होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना रोजच्या व्यवहारात उतरवणारे. त्यांच्या लेखणीतून न्यायाची भाषा उमटली. त्यांच्या वागण्यातून समतेची साक्ष मिळाली. त्यांचा बातमीपेक्षा माणूस कसा असावा यावर भर होता.आज ते चहाच्या टपरीवर नाहीत. गप्पा थांबल्या आहेत. पण त्यांनी दिलेला ध्यास, दिलेली दिशा आणि दिलेली माणुसकी शिल्लक आहे. रणजितभैय्या, शेवटचा 'जयभीम' तुमचा आवाज थांबलेला नाही. तो चळवळीच्या प्रत्येक पावलात अजूनही घुमतो आहे. ■ ■



भूपेंद्र गणवीर
9850031019

## मा. रणजित मेश्राम यांचे जाण्याचे दु:ख शब्दातीत आहे !

मा. रणजित मेश्राम यांचे जाण्याचे दु:ख शब्दातीत आहे. त्यांचे आमचे संबंध हे वैचारिक आणि सामाजिक बांधिलकीचे होते. कितीतरी आठवणी आहेत. सोबत सभा संमेलनात आम्ही असंख्य वेळा सोबत होतो आणि वैचारिक समानता हा धागा जीवनभर जोपासत होतो. त्यांनीच आमचा जीवन गौरव कार्यक्रम ऑक्टोबर 2002 मध्ये घेतला आणि त्यासाठी त्यांनी जे काही केले त्या ऋणातून मुक्त होणे आता असंभव आहे. त्यांची वैचारिक भाषणे आजही नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. त्यांनी जी पत्रकारिता केली तीही सामाजिक कटिबद्धता पूर्ण होती. त्यांनी अनेक साहित्य संमेलने आयोजित केली. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुले, शाहू विचारांचा वसा आणि वारसा होता. या महान व्यक्तीत्वाला सविनय भावपूर्ण आदरांजली.

– नागेश चौधरी
बहुजन विचारवंत



## निर्भिडपणे बोलणारा वक्ता आता कायमस्वरूपी शांत झाला...

आंबेडकरी चळवळीचे झुंझार नेते, प्रभावी वक्ते आणि निर्भिड पत्रकार प्रा. रणजीत मेश्राम यांच्या दु:खद निधनाने आंबेडकरी साहित्य व सामाजिक चळवळीत न भरुन निघणारी पोकळी निर्माण झाली आहे, रणजीतदादांनी आपल्या पत्रकारितेच्या कार्यकाळात अफलातून अभिव्यक्तीच्या संदर्भात प्रभावी लेखन करुन कर्तव्यदक्ष व्यक्तींना सामाजिक पटलावर प्रसिद्धीस आणले होते, रणजीतदादा नेहमीच अभ्यासपुर्ण वक्तव्य व त्यातील सत्य संदर्भ निर्भिडपणे मांडत असत, आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर ॲण्ड लिटरेचर या संस्थेतर्फे 2025 चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्काराने त्याना सन्मानीत करण्यात आले होते, निर्भिडपणे बोलणारा वक्ता आता कायमस्वरूपी शांत झाला आहे, एक उमदा प्रभुत्ववान पुढारी आणि सामाजिक व साहित्य चळवळीच्या दिलखुलास सच्च्या मित्राचे 4 मार्च ला सकाळी साडेआठ वाजता दु:खद निधन झाले, कायमस्वरुपी स्मृतीत राहणाऱ्या आमच्या स्नेही मित्रास आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर ॲण्ड लिटरेचर तर्फे विनम्र श्रद्धांजली!

– दादाकांत धनविजय
साहित्यिक/ अध्यक्ष
आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर ॲण्ड लिटरेचर

## विश्वासू मित्र

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यात विश्वासाला खुप महत्व आहे. विश्वास हा केवळ माणसांवर नसतो तर तो ईश्वरावरही असतो, पण हा विश्वास दृढ असायला हवा. विश्वासाचा अर्थ हा नव्हे की, मला जसे हवे तसेच देव देईल तर विश्वासाचा अर्थ हा असावा लागतो की देव जे काही करेल ते माझ्या हिताचेच असेल. काळाच्या ओघात बऱ्याच गोष्टी बदलत असतात पण विश्वासाच्या मजबूत धाग्यांनी विणल्या गेलेले नाते हे कधीही बदलत नाही. म्हणून या नात्यांना जपणे ही आपली जबाबदारी असते. आर्थिक दृष्ट्या श्रीमंत असणाऱ्या व्यक्ती आपल्याला जागोजागी दिसतात पण मनाची श्रीमंती असणारी माणसे ज्या जागी असतील त्या जागेचा शोध घ्यावा लागतो. कारण काही गोष्टी दुर्मिळ असतात. जसे विश्वासू मित्र, जो प्रतिकूल परिस्थितीतही खंबीरपणे साथ देतो. आयुष्याच्या लढाईत जो आपल्यासाठी लढतो असा साहसी मित्र हा योद्धाच असतो. ही माणसे मनाने पवित्र असतात. या पावित्र्याची प्रचिती एकांतात येते. माणूस चारचौघात कसा वागतो त्यापेक्षा तो चारभिंतीच्या आत एकांतात कसा वागतो यावर त्याचे चारित्र्य अवलंबून असते. एकांतात जी व्यक्ती तन, मन आणि कर्माने पवित्र असतो तो खरा सर्वश्रेष्ठ व्यक्ती असतो. अशा व्यक्ती जर आपल्या शुभचिंतक असतील तर संकटकाळात यांनी दिलेल्या शुभेच्छा या आपल्यावर बरसणाऱ्या संकटाच्या पावसात छत्रीचे काम करतात. वेळप्रसंगी ते कटू शब्दांचा वापर करतात त्यामागे आपले भले व्हावे हाच त्यांचा उद्देश असतो. खरा मित्र आपल्याला खडसावून आपली साथ देतो तर स्वार्थी माणूस गोड बोलून मुळावर घाव घालतो. पण हा चांगुलपणाचा मुखवटा कधी ना कधी गळून पडतो. खऱ्या मित्राची जरी दररोज भेट झाली नाही तरी आपण मात्र त्याच्या मनाच्या दरवाज्यावर संवादाची थाप मारत रहावी. भेट जरी झाली नाही तरी दरवाज्याच्या साखळीचा आवाज नेहमी होत रहावा. विश्वासू मित्राचा कधीही विश्वासघात करू नये. कारण त्याने जरी आपल्या अशा कृत्यावर प्रतिक्रिया दिली नाही तरी त्याच्या मनावरचे घाव कधीच मिटत नसतात. `खाली शीशे भी, निशान रखते है, टूटे हुए दिल भी, अरमान रखते हैं, जो खामोशी से गुज़र जाए, वह दरिया भी, दिल में, तूफ़ान रखते है. ■ ■



# गौरवोद्गार

जग हे पुरूषांचे असते, स्त्री त्याला सहाय्यकारी, हा विचार इतका भिनलेला असलेल्या या जगात स्त्रीया काय कामगिरी बजावतात हे आजच्या घडीचे उदाहरण आहे. आमच्या डॉ. आशाताई जुवारकर. त्या चिफ साईन्टीस्ट ॲन्ड हेड इको सिस्टीम CSIR नीरी नागपूर येथे कार्यरत होत्या, रिटायर नंतर सुद्धा त्याची सेवा देणे सुरू असते. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी यांनी दोन परसेंन्ट साईन्टीस्ट निवडले. त्यात आमच्या आशाताईंचा नंबर आहे. शब्द कधी मनाला चिंतन करायला लावतात, जसा पारिजातकाचा सडा अंगणी पडला की सुंदर गालीचा तयार होतो, त्यापरी आशाताईंनी वैज्ञानिक युगात, जगात आणि देशात विज्ञानाचा गालीचा पसरवला. खांद्यावर हात, गळ्यात गळा घेऊ या मैत्रीचा कळवळा हृदयात मात्र आनंद सोहळा आणि जगण्याचा मला सूर इथेच गवसला. आगळा वेगळा, या नुसत्या मैत्रीबद्दलच्या ओळी नाहीत तर माझ्या जीवनातील माझ्या मैत्रिणी बद्दलचा अभिमान आहे आणि हा तिच्या कलागुणांचा गौरव आहे. म्हणतात ना, स्त्री म्हणजे अभंगातील संतवाणी, स्त्री म्हणजेच उन्हातले गार पाणी, तिची वैज्ञानिक कामगिरी जगाने वाखानावी असे व्यक्तिमत्त्व म्हणजे आशाताई जुवारकर होय. साधी राहणी उच्च विचारसरणी या प्रमाणे सर्वसामान्यांमध्ये मिळून मिसळून राहणाऱ्या, आत्मसन्मानाने रहायला शिकवणाऱ्या, आधार देणाऱ्या, आयुष्य फक्त घालवायला नाही तर ते जगायला शिकवणाऱ्या आमच्या डॉ. आशाताई. नौकरी म्हणजे निव्वळ उपजिवीकेचे साधन नसून आपल्या ज्ञानाचा उपयोग देशासाठी, समाजासाठी व्हावा हा त्यांचा उद्देश. 'पंख होने से कुछ नहीं होता, उडान हौसले से होती है,' हे त्यांचे वैचारिक वैशिष्ट्य. नजरेत सदैव नवी दिशा आणि क्षितीजापार जाण्याची जिद्द बाळगली तेव्हा हे यश मिळाले. सतत ध्येयनिष्ठ राहून इच्छाशक्तीच्या बळावर हे अढळ स्थान प्राप्त झाले. जीवन का नाम ही संघर्ष है। जीवनात आव्हाने येतात. पण त्या आव्हानाला सामोरे जावून वैचारिक विचारांनी ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करून देशाचे नाव उज्वल केले. अशा आमच्या डॉ. आशाताई आव्हान पेलण्याची ताकद ठेवतात आणि दिपस्तंभ बनून मार्गदर्शक ही ठरतात. डॉ. आशाताईंचे वैज्ञानिक कार्य म्हणजे 'नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी, या उक्तीप्रमाणे आहे. तत्वांना मूलाधार मानून त्या आपली भूमिका साकारतात. भरारीसाठी नवे आकाश शोधून जगाच्या कानाकोपऱ्यात किर्ती पसरवून स्त्री जगताची सुद्धा मान उंचावली. एक स्त्री म्हणून त्यांचे कार्य आम्हालाही प्रेरणा देते. हे सहजासहजी साध्य झालेले नाही तर जीवनात तपस्या करावी लागली त्यांना. त्यांच्या नावातच आशा आहे आणि हा आशावाद आमच्या स्त्रियांच्या जीवनातही आशेचे किरण पसरवेल ही खात्री आहे. अशा या डॉ. आशाताईंच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा. बुलंद हौसले असणाऱ्या मैत्रीणीला अनेकानेक शुभेच्छा आणि मनापासून अभिनंदन. शेवटी एवढेच म्हणेन Strong person And water fall always channel their own path. ■ ■



मंदाकिनी काकडे,
मो. 8600017963

# विवाह संस्थेचे भविष्य अंधारमय

आज आपण आधुनिक युगात जगत आहोत. सुख-सुविधा चैनेच्या वस्तू जसे वातानुकूलीत बंगला, वातानुकूलित चार चाकी, फ्रिज, कुलर, पंखे खायला गोड-धोड, पिझ्झा, बर्गर आपल्या सेवेत नेहमीच तयार असतो. चंगळही चंगळ. या सर्व सुखसुविधा जरी आपल्या सेवेत हजर असल्या तरी आपण बहुजन समाज सुखी व समाधानी नाही. याचे कारण मुला मुलींचे उशिरा होत असलेले लग्न. आज मुला मुलीचे आई-वडील खूप चिंताग्रस्त आहेत. आमच्या पिढीने म्हणजे 1950-1960 च्या दरम्यान जन्मलेल्या लोकांनी जे दु:ख, कष्ट, हालपेटा, अपमान सहन केला, तो त्यापुढील पिढीने म्हणजे ज्याचा जन्म 1990 च्या नंतर झालेला आहे, त्या पिढीच्या वाट्याला आलेला नाही. त्यामुळे 1990 नंतर जन्मलेली पीढी ही अतिशय भाग्यवान आहे. जुन्या पिढीला जीवन जगण्याकरता किती संघर्ष करावा लागला, अन्न मिळवण्याकरता किती काबाडकष्ट करावे लागले. हे सर्व काही या 1990 सालच्या नंतरच्या पिढीला माहीत नाही. पूर्वी म्हणजे 1950 च्या अगोदर जर मुला-मुलीचे लग्न करायचे असेल तर काका, मामा, मावसा हेच मुला मुलींना बघून यायचे व लग्न ठरवून टाकायचे. यामध्ये कोणत्याही मुला-मुलीची पसंती किंवा ना पसंती विचारायची सोय नव्हती. मुलगा-मुलगी आपला भावी पती-पत्नी कशी आहे याविषयी शंका घेऊ शकत नव्हती. एवढे असूनही संसार सुखाचा, समाधानकारक व टिकाऊ स्वरूपाचा असा होता. आजही आमच्या मित्रांच्या लग्नाला साठ वर्षे, कोणाच्या लग्नाला पन्नास वर्षे तर कोणाच्या लग्नाला चाळीस वर्षे पूर्ण झालेली आहेत. हे आजच्या तरुण पिढीने समजून घेणे आवश्यक आहे. 1990 च्या नंतर जन्माला आलेली मुले-मुली लग्न करतात ही आनंदाची गोष्ट आहे. आई वडील साखरपुड्यात दोन-तीन लाख खर्च करतात. नंतर लग्नात 20 - 40 लाख रुपये खर्च करतात. खर्च करण्यात काही चूक किंवा वाद होण्याचे कारण नाही. परंतु नंतर बातमी येते की मुलगी दुसऱ्या दिवशी कोणालाही न सांगता निघून गेली किंवा दोघांचे भांडण झाले व ताटातूट झाली. नंतर अशा प्रकारच्या केसेस कोर्टात जातात व तेथे अडकून/प्रलंबित राहतात. अशा गोष्टीमुळे मुलामुलींचे आयुष्य बर्बाद होते. परंतु आमच्या समाजातील आई-वडिलांनी या सर्व गोष्टीतून काहीही बोध/धडा घेतलेला नाहीच. आता मुलीच्या अपेक्षा खूप वाढलेल्या आहेत. आमची मुलगी इंजिनिअर, डॉक्टर आहे तिला दहा-बारा लाखाचे पॅकेज आहे. आम्हाला मुलगा इंजिनिअर, डॉक्टर, सरकारी नोकरीवाला पाहिजे. बरे सरकारी नोकरी, इंजिनिअर, डॉक्टर येथपर्यंत आपण ठीक समजू शकतो. परंतु अतिरिक्त मागणी त्यांच्याकडे शेती पाहिजे. बरे काही लोकांकडे शेती असते तेही मागणी आपण ठीक समजू. आमच्या मुलीला शेतीमधील काही समजत नाही तरी आपण मान्य करायला काही हरकत नाही. परंतु अति भयानक मागणी किंवा अपेक्षा म्हणजे मुलांचे पुणे, मुंबई येथे दोन बीएचके फ्लॅट (2BHK FLAT) पाहिजे, चार चाकी गाडी पाहिजे. 15 ते 20 लाखाचे पॅकेज पाहिजे. आता अशा प्रकारची अपेक्षा करणे म्हणजे खूपच मुलाला तसेच मुलाच्या आई वडिलांना भयंकर प्रकारचे अपमानित करणे होय. बरे मुलीच्या आई-वडिलांची परिस्थिती विचारली तर मुलीचा भाऊ बेकार, घरी शेती नाही, घर कसे तरी आहे. याविषयी आईवडील भाऊ किंवा मुलीला काही वाटत नाही. अशा रीतीने मुलीचे वय वाढत जाते, ती 30 नंतर 32 ची होते नंतर 35 वर्षाची होते. वयाच्या 35 किंवा 36 नंतर मेडिकलच्या समस्या उद्भवतात. अपत्य होण्याचे चान्सेस फार कमी असतात. तरीही त्या मुलीचे लग्न होऊ शकत नाही. त्यानंतर मुलीचे आई वडील हतबल होतात. अव्वाच्या-सव्वा डिमांड मुलांना सांगितल्यामुळे किंवा अपेक्षा केल्यामुळे 25 ते 30 वयापर्यंत कोणताही मुलगा अशा प्रकारच्या सोयी-सुविधा आपल्याकरता निर्माण करू शकत नाही. हे सर्व मुलींचे आई-वडिलांना समजते. परंतु ते मुलीच्या आग्रहाला बळी पडतात व शेवटी जे व्हायचे ते होते. शेतकऱ्यांच्या मुलांची स्थिती तर अजूनही गंभीर होत चाललेली आहे. त्यांना लग्नाच्या मुली भेटणे कठीण झालेले आहे. काही मुले तर घटस्फोटीत किंवा विधवा महिलांशी लग्न करण्यास तयार आहेत. खरे म्हणजे शेतकऱ्यासारखा सुखी माणूस आज कुठेच मिळणार नाही. गाई, म्हशी दूध दुभते, अन्नधान्य याची काही कमी नाही. तेव्हा मुलींनी आता थोडे स्वत:ला बदलून शेतकऱ्यांच्या मुलाची लग्न करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. काही मुली आजकाल अशा बदलास अनुकूल आहेत ही एक आनंदाची गोष्ट आहे. यावर एक रामबाण उपाय म्हणून मला सुचवासा वाटतो. तो असा की आपण आता काळाची पावले उलटी करू या. पूर्वी पत्नी हे घर सांभाळायची म्हणजे ती 'गृहिणी' व्हायची, पती हा कमाई करायचा. या दोघांच्या संगनमताने घर खूप छान चालायचे, संसार सुखाचा व समाधानाचा होत होता. हे सर्वांना माहीत आहे. आता मुलींनी कमाई करायची व मुलाने 'गृहाना' म्हणजे घर सांभाळायचे काम करायचे. याकरता खूप मोठे किंवा छान उदाहरण आपल्याला देता येईल. ते असे 'कोण बनेगा करोडपती' मध्ये एक महिला आली होती, ती पायाने पंगू होती. तिला चालता येत नव्हते, पण ती खूप शिकलेली व हुशार होती. त्या हुशारीने ती डेप्युटी कलेक्टर झालेली होती. परंतु तिने जो पती निवडला त्याला तोड नाही. तिचा पतीसुद्धा शिकलेला होता. या दोघात समझोता झाला व पतीने घर सांभाळायचे व पत्नीने नोकरी करायची असे ठरले. आजसुद्धा या दोघांचा संसार खूप सुखांचा व आनंदाचा सुरू आहे. हा 'केबीसीचा' एपिसोड बहुतेक लोकांनी बघितलेला असावा. आता वधूने/मुलीने आज ठाम निर्णय घ्यायचा आहे की मला लग्न करायचे आहे. पण माझा पती, जोडीदार, जीवनसाथी हा छान शिकलेला, समजूतदार, निर्व्यसनी, मायाळू माणूस असावा. मुलीने जर अशी इच्छा व्यक्त केली व निर्णय घेतला तर मुले शोधायला काही वेळ लागणार नाही अशा मुलाला. 'गृहाना' बनवा व सुखाने संसार करा. आता मुलाने कमविण्याचे दिवस गेले व मुलीने कमवण्याचे दिवस आले. असे आपण आता मानायला हरकत नाही. हे आपण तत्व समजू या. नवीन पायंडा पडायला हरकत नाही. अशा प्रकारची तडजोड करून निवड केली तर ती एक विवाह संस्थेत क्रांती होईल. चला तर मग आपण विवाह संस्था अजूनही बळकट करू व एक चांगल्या प्रकारचे सामाजिक स्वास्थ्य निर्माण करू या. ■ ■



महादेव डांबरे
मो. 9665047153

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे द्रोही - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक शाखांपैकी 'भारतीय जनता पक्ष' हे त्याचे राजकीय संगठन आहे. हे सर्वश्रुत आहे. देशातल्या प्रत्येक राजकीय पक्षाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतल्याशिवाय त्यांच्या चळवळीची परिपूर्णतः होत नाही, हे संघाच्या लक्षात आल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हेडगेवार यांचे एकमेकांशी घनिष्ठ संबंध होते आणि हिंदू समाजाच्या अवस्थेविषयी दोघेही दु:खी बनत होते, असे अधोरेखित करतात. अशी वल्गना संघाची माणसे वेळोवेळी करीत असल्याचे पाहावयास मिळते. त्यांचा खोटारडेपणा एकदा नागपुरातील डॉ. भाऊ लोखंडे यांनी उघडकीस आणला होता. समाज माध्यमातील एका चॅनेलवर डॉ. भाऊ लोखंडे आणि संघाचे एक स्वयंसेवक यांच्यात जुंपली होती. डॉ. भाऊ लोखंडे त्या स्वयंसेवकाला म्हणाले होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हेडगेवार यांचे एकमेकांशी घनिष्ठ संबंध होते तर पुरावे द्या. त्यावेळी संघाच्या कार्यकर्त्यास पुरावा सादर करता आला नाही. नुसते टोलवाटोलवीचे उत्तरे देत होता. ही वस्तुस्थिती आहे. खरे तर राष्ट्रीय काँग्रेसच्या उदरातून संघाचा जन्म झाला. लो. टिळक 1890 मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले. जोवर लोकमान्य टिळक यांचेकडे स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व होते. तोवर संघाचा उदय झाला नाही. जसाही लोक. टिळकांचा 1 ऑगस्ट 1920 रोजी मृत्यू झाला आणि स्वातंत्र्याच्या लढ्याचे नेतृत्व गांधीजींकडे गेले, म्हणजे उच्चवर्णीयांकडून दुसऱ्यांकडे गेले, तसे काही वर्षातच म्हणजे 27 सप्टेंबर 1925 रोजी हेडगेवार यांनी नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. श्री. गोळवलकर यांनी संघाच्या माध्यमातून विकृत तत्त्वज्ञान मांडले. संघाने राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज, संघराज्याची रचना व भारतीय राज्यघटना याला कायमचा विरोध केला व जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेचा पुरस्कार केला. ज्या भारतीय नेत्यांनी स्वातंत्र्यानंतर भारताच्या उज्वल भविष्याची स्वप्ने बघितली त्या विचाराला संघाने विरोध केला. बदनामीचे षडयंत्र रचले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय, सामाजिक, राष्ट्रीय, धार्मिक, आर्थिक तत्त्वज्ञानाला संघाने विरोध केला आहे. याबाबत व्यक्त होणे समयोचित आहे.

**संघाने भारतीय राज्यघटनेचा नेहमीच उपमर्द केला :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भारतीय राज्यघटनेची प्रक्रिया सुरू होती तेव्हा या हिंदुत्ववादी विचारप्रणालीने तीव्र विरोध केला होता. 1949- 50 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा कायदामंत्री होते व घटनेचा अंतिम मसुदा सादर केला तेव्हा संघाच्या 'ऑर्गनायझर' या मुखपत्राच्या 30 नोव्हेंबर 1949 च्या अग्रलेखात मत व्यक्त केले की, 'भारताच्या नवख्या राज्यघटनेतील सर्वात वाईट गोष्ट म्हणजे, त्यात भारतीय काहीच नाही. प्राचीन भारताच्या विलक्षण घटनात्मक विकासाचा कसलाही उल्लेख नाही. स्पार्टाचे लायकरगुस किंवा पर्शियाचे सोलोन यांच्या कित्येक वर्षे आधीच मनुस्मृती लिहिली गेली होती. आजपर्यंत मनुस्मृतीची जगभर प्रसंशा केली जाते आणि तिच्यातून स्वयंस्फूर्त धार्मिक नियम पालन आणि समानतेचे तत्त्व निर्माण होते. परंतु आमच्या घटनातज्ज्ञांच्या दृष्टीने त्यात काहीच अर्थ नाही.' गोळवलकरांनी मांडले होते की, येथून तेथून परकीय संकल्पना गोळा करून त्यातून बनवलेली 'गोधडी' म्हणजे भारतीय घटना होय. (संदर्भ : संघाचा असली चेहरा, पृ 20, भाई वैद्य). संघपरिवार केंद्रात सत्तेवर आल्यावरही गोळवलकरांचे वारसदार श्री. सुदर्शन यांनीही संविधानाला गोधडीची उपमा दिलेली आहे. तसेच 'भारतीय राज्यघटना कितीही चांगली असली तरी हे लक्षात घेतले पाहिजे की, ती एका अस्पृश्याने लिहिली आहे.' अशी संघाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत कुत्सित बीजभावना होती. संघ परिवारातील विश्व हिंदू परिषदेने चंदिगड अधिवेशनात भारतातील सर्व अध:पतनाचे मूळ भारतीय राज्यघटनेत असल्याचा दावा केला. आचार्य वामदेव महंताने त्या अधिवेशनात मागणी केली की, ही घटना बदलून तिच्या जागी मनुस्मृतीवर आधारलेली राज्यघटना बनवायची गरज आहे, असे विचार मांडले. (तत्रैव, भाई वैद्य, पृ. 20) 27 जानेवारी 1950 या कट्टरवाद्यांनी ही राज्यघटना आम्हाला मान्य नाही म्हणून त्याविरोधात निदर्शने केली होती. (संदर्भ : स्वयंघोषित देशभक्ताचे वास्तव, चंद्रकांत झटाले, पृ. 19) प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आर्थिक सल्लागार विवेक देबरॉय यांनी 15 ऑगस्ट 2023 रोजी 'द मिंट' मध्ये 'देअर इज अ केस फॉर वि द पीपल्स टू एंब्रास अ न्यू कॉन्स्टिट्यूशन' या शीर्षकाखाली लेख लिहिला. त्यात देशाचे संविधान बदलून नवीन संविधानाची गरज असल्याचे मत मांडले.

**संघाचा हिंदू कोड बिलाला विरोध :** भारतातील सकल हिंदू स्त्रियांच्या हक्काचा जाहीरनामा म्हणजे हिंदू कोड बिल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून हिंदू स्त्रियांना संपत्तीत समान वाटा दिला जावा, घटस्फोटाचा अधिकार मिळावा अशी जोरदार मागणी केली होती. विशेष म्हणजे या विधेयकात प्रथमच विधवांना पुनर्विवाह करण्याचा, मुलींना मुलांप्रमाणेच संपत्तीत समान हक्क देण्याचा, छळवादी पतीकडून घटस्फोट देण्याचा व दुसरे लग्न करण्याचा व दत्तक घेण्याचा अधिकार बहाल करण्यात आले होते. त्यावेळी काँग्रेसमधील रूढीप्रिय लोकांपासून ते हिंदुत्ववादी संघटनांनी जोरदार विरोध केला. या विधेयकाची कुचेष्टा केली. हिंदू संस्कृतीवरचा हल्ला समजून विरोधात मोर्चे काढलेत. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या विधेयकाला प्रथम विरोध केला. त्यांनी या मुद्यांवर एकट्या दिल्लीतच 79 सभा मोर्चे काढले होते. त्यात हिंदू संस्कृती आणि परंपरांवर आघात समजून डॉ. आंबेडकर यांचे पुतळे जाळण्यात आले.' (रामचंद्र गुहा, द हिंदू, 18 जुलै, 2004 चा अंक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विरुद्ध, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सुभाष गाताडे, पृ.9) या बिलाबाबत संकेत पिठाचे शंकराचार्य जेरेशास्त्री यांनी रुक्मिणी मैदानावर सनातनी सभेत उद्गार काढले होते की, 'डॉ. आंबेडकर यांनी नवी हिंदू कोड बिल किंवा नवी भीमस्मृती रचली आहे आणि त्यातील सर्व गोष्टींना धर्मशास्त्राचा आधार आहे असे सांगत आहेत. पण दूध अगर गंगोदक कितीही पवित्र असले तरी ते नालीतून अगर गटारातून आले तर पवित्र मानता येत नाही, त्याचप्रमाणे धर्मशास्त्र कितीही प्रमाण असले तरी ते डॉ. आंबेडकरांसारख्या महाराकडून आले असल्यामुळे प्रमाण मानता येत नाही.' (स्वयंघोषित देशभक्तांचे वास्तव, चंद्रकांत झटाले, पृ. 18) या जेरेशास्त्री विखाराचा थोर साहित्यिक वि. स. खांडेकर यांनी 16 फेब्रुवारी 1950 च्या जाहीर सभेतून चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले की, 'जेरेशास्त्र्यांसारख्या प्रतिगामी लोकांच्या गटारी विचारांना देखील पावन करण्याचे पावित्र डॉ. आंबेडकरांच्या विद्वत्तेत आहे'. (तत्रैव, झटाले, पृ. 18)







**संघाने मनुस्मृतीचे समर्थन केले :** मनुस्मृतीमध्ये असलेल्या विषमतेवर आणि जातीय भेदभावावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आक्षेप होता. त्यात स्त्रियां आणि शूद्रांवरील अन्यायकारक गोष्टी लिहिल्या होत्या, ज्यामुळे समाजात विषमता पसरत होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 25 डिसें. 1927 रोजी महाड येथे आपल्या सहकार-यांसमवेत मनुस्मृतीचे दहन केले. संघाने मात्र मनुस्मृतीचे जोरदार समर्थन केले. 1 जानेवारी 1969 रोजी 'नवाकाळ' येथे गोळवलकरांची विधाने छापून आली होती. त्यांनी मनुस्मृतीतील गोष्टी योग्य असल्याचे पटवून देण्याचा प्रयत्न केला. शुद्धीकरण - शिवाशिवीच्या आधारावर वर्णव्यवस्था ही ईश्वरदत्त असल्याचे सांगितले होते. 'ती ईश्वर निर्मित असल्यामुळेच तिची मोडतोड करण्याचे प्रयत्न झाले तरी आम्हाला त्याविषयी चिंता नाही. कारण माणूस आज मोडतोड करतो; परंतु जी ईश्वरनिर्मित योजना आहे ती पुन्हा पुन्हा प्रस्थापित झाल्याशिवाय राहणारच नाही.' (श्री. गुरुजी समग्र, खंड, 9, पान.263, सुभाष गाताडे, पृ.14 )

**संघ आरक्षणविरोधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत आरक्षणबाबत युक्तीवाद केला. संविधान सभेत बुद्धिवंतांशी संघर्ष करून त्यांची संमती मिळवून घेतली व येथल्या अनुसूचित जाती, जमाती व ईतर मागासवर्गीय प्रवर्गाला आरक्षण मिळवून दिले. त्याचा गोळवलकरांनी मनातून स्वागत तर सोडाच समर्थनही केले नव्हते. आरक्षणाबाबत गोळवलकरांचे म्हणणे होते की, सामाजिक एकतेवर घातला गेलेला हा जबरदस्त घाव आहे. यामुळे परस्पर सद्भावावर आधारित प्राचीन नातेसंबंध विदीर्ण होतील. त्यांना घटनात्मक सुरक्षितता दिल्यामुळे आपापसातील वितुष्ट वाढण्याचा धोका आहे. (गोळवलकर, बंच ऑफ थॉट्स, पान 363, सुभाष गाताडे )

**संघाची समता विरुद्ध समरसता :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजापुढे समता, स्वातंत्र्य व बंधुता ही त्रिसूत्री ठेवली. या त्रिसूत्रीला संघ परिवाराचा पूर्ण विरोध आहे, असे निरीक्षण भाई वैद्य यांनी मांडले आहे. श्री. गोळवलकरांनी 'विचारधन' मध्ये म्हटले आहे, Not Equality but Harmony म्हणजे गोळवलकरांना समतेची संकल्पना अयोग्य वाटते. समरसता म्हणजे ज्या स्थितीत आहात त्याच्याशी तादात्म्य पावने म्हणजे समरसता. डॉ. भालचंद्र फडके यांनी 'आंबेडकरवाद आणि हिंदुत्ववाद - क्रांती आणि प्रतिक्रांती' या निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समता आणि डॉ. हेडगेवार प्रणीत समरसता हे विचारतत्व एकमेकांशी पूरक नसून ती दोन विरोधी टोके असल्याची नोंद केली आहे. एक क्रांती तर दुसरी प्रतिक्रांती असे म्हटले आहे. संघाचे दत्तोपंत ठेंगडी समरसता म्हणजे 'बंधुभावना' अशी भूमिका मांडतात, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'स्वातंत्र्य आणि बंधुभाव या वस्तुतः साधित संकल्पना आहेत. या दोन संकल्पनातच बंधुभाव आणि स्वातंत्र्य यांची उगस्थाने आहेत.' (भालचंद्र फडके, आंबेडकरवाद आणि हिंदुत्ववाद - क्रांती आणि प्रतिक्रांती, पृ. 25) ठेंगडी यांनी 'समता' हे अंतिम टर्मिनस असू शकत नाही, तर समरसता हे अंतिम स्टेशन आहे. समतेपाशी जर समरसता गाडी थांबली तर समता टिकणे कठीण आहे, अशी भूमिका घेतली. ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समताविषयक भूमिकेचे अवमूल्यन करणारे आहे, असे डॉ. फडके यांनी ठामपणे प्रतिपादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानात समता या मूल्याला मुख्य स्थान आहे. त्यांचा समतेचा लढा मानवी हक्कासाठी होता तर हेडगेवारांचा भर हिंदूंच्या संघटनेवर होता. हिंदूंच्या संघटनेमुळे जी शक्ती निर्माण होईल ती हिंदूचे राष्ट्र समर्थ करण्यासाठी वेचावी अशी त्यांची भूमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची न्यायासाठी, समतेसाठी क्रांती आहे, तर हेगडेवारांची समरसतेची चळवळ ही प्रतिक्रांती मार्गाची आहे, असे सैद्धांतिक विश्लेषण डॉ. भालचंद्र फडके यांनी केले.

संकलन
धर्मेश प्रसेनजित
मो. 9850399508

क्रमश: ■ ■

# भावपूर्ण श्रद्धांजली



# आंबेडकरी चळवळीचे वैभव गेलं ...

## संघर्षशील आवाज हरपला

आंबेडकरी चळवळीला आयुष्यभर दिशा देणारे, समाजातील वंचित-शोषितांसाठी सतत लढणारे ज्येष्ठ नेते रणजित दादा मेश्राम यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने चळवळीतील एक विचारवंत आणि संघर्षशील आवाज हरपला आहे. समाजप्रबोधन, लेखन आणि सामाजिक बांधिलकी यासाठी त्यांनी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन!

डॉ. नितीन राऊत
आमदार

## शब्दातुन नवउर्जा वृद्धिंगत करणारा बादशहा निवर्तला

रिपब्लिकन चळवळीतील चिंतनशील चिकित्सक वृत्तीचा प्रखर विद्रोही लेखन व शब्दातुन नवउर्जा वृद्धिंगत करणारा बादशहा निवर्तला. रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया भारिप बहुजन महासंघ खनिकर्म महामंडळ पत्रकारिता प्राध्यापक आदी क्षेत्रात आपल्या कार्याला सतत चाणाक्ष दृष्टीने समतोल निर्माण करत वर्तमान विषम परिस्थितीत आंबेडकरी रिपब्लिकन चळवळीचा भविष्यकालीन इतिहास जनसामान्यांच्या मनात खोलवर रुजवणारा विश्वलेखक निवृत्त झाला. त्यांच्या जाण्याने आंबेडकर चळवळीची न भरून निघणारी हानी झाली.

भन्ते नाग दिपंकर महास्थवीर

## रणजीत मेश्राम हे आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ वक्ता, पत्रकार व नेते होते

प्रा. रणजीत मेश्राम हे आंबेडकर चळवळीतील एक ज्येष्ठ वक्ते, नेते आणि पत्रकार होते. त्यांच्या भाषणातील शब्दांचा ओलावा आजही आठवतो. ते पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालयात समाजशास्त्राचे प्राध्यापक होते. प्रा. रणजीत मेश्राम यांच्या निधनामुळे आंबेडकरी चळवळीची फार मोठी हानी झाली आहे. त्यांनी पत्रकार क्षेत्रामध्ये आपल्या लेखणीने एक वेगळा ठसा उमटविला होता. विशेष म्हणजे ते महाराष्ट्र शासनाच्या डॉ. आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य होते. त्यांना भावपूर्ण आदरांजली.

डॉ. प्रदीप आगलावे

## प्रखर वक्ता गमावला.

मा. रणजितदादा माझे चांगले मित्र होते. एक सामाजिक विचारवंत होते. त्यांचे जाण्याने आंबेडकरी चळवळीची मोठी हानी झाली आहे. आंबेडकरी चळवळीने एक प्रखर वक्ता गमावला.

सच्चिदानंद दारूंडे
महासचिव, महाराष्ट्र ऑफिसर्स फोरम

## प्रिय रणजीत दादा जयभीम...अभिवादन...

तुम्ही आंबेडकरी समाजाचे मानसिक परिवर्तन करण्याची ऐतिहासिक जबाबदारी सोडून एवढ्या लवकर निघून गेला, यावर विश्वासच बसत नाही. 'बोलो.. पत्रकार..' हे तुमचे शब्द आता माझ्या कानी पडणार नाहीत. खूप आठवणी आहेत. तुम्ही माझे व्यक्तिगत नुकसान करून गेला. त्याची दाद मी कोणाकडे मागू? माझे जिवाभावाचे मित्र एक एक करून सोडून चालले आहात. अशोक थूल गेले, त्या आधी संकल्प डांगे गेले. विमलसूर्य चिमणकर गेले. दोन दिवसांपूर्वी दत्ता इंगोले गेले आणि आज तुमची बातमी कळली. तुम्ही हाडाचे पत्रकार होता, पण स्वतःची तुमची ही बातमी खूप धक्कादायक आहे. आपण ठरविलेली अनेक कामे अपूर्ण राहिली आहेत. त्यावर तुमचे चिंतन आता कोणाकडून ऐकावे. खूप आठवणी मनात दाटून येत आहेत. मी तुमच्यावर रागावलो तरी तुम्ही मला कधी दूर लोटले नाही. तुमचे माझ्याबद्दल असलेले प्रेम तसूभरही कमी झाले नाही. तुम्ही मला तुषार गांधी यांच्यासोबत शेजारी घेऊन उभे राहिला, तो क्षण माझ्या जीवनातील खूप मोठी घटना होती. तुम्ही जाहीरपणे माझ्या लेखनाचे आणि विचारांचे कौतुक केले आहे. ज्यांच्यामुळे मी घडलो, अशा मित्रांपैकी तुम्ही एक होते. तुम्ही अशी अचानक एक्झिट घेऊन बरे नाही केले, असे मी आता तुमच्यावर रागावू शकत नाही.दादा ....

मिलिंद कीर्ती

## निर्भिड पत्रकार ओळख जनमानसात राहिली...

स्मृतिशेष मान. प्रा. रणजीत मेश्राम सरांचे दुःखद निधनाची बातमी ऐकून मन सुन्न झाले. सरांना आंबेडकरी चळवळीतील न ओळखणारा माणूस विरळाच असेल! एक आंबेडकरी तत्वचिंतक, भाष्यकार, फर्डा वक्ता, निर्भिड पत्रकार, धुरंधर राजकारणी, साहित्यिक म्हणून प्रा. रणजीत मेश्राम सरांची ओळख जनमानसात राहिली आहे. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीत जी एक पोकळी निर्माण झाली आहे ती भरुन निघावी या सदिच्छेसह सरांना भावपूर्ण आदरांजली!.. विनम्र अभिवादन!!...

शालिक जिल्हेकर, कवी व नाटककार

## प्रेरणादायी व्यक्तिमत्व निघून जाणे चळवळीची हानी

सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक चळवळीतील विचारवंत योद्धा समीक्षक, प्रख्यात लेखक, पत्रकार आदरणीय रणजीत मेश्राम दादांचा जीवन जगण्याचा संघर्ष अखेर संपला आणि निधनाची बातमी समजली. वाटले होते दादा जिंकतीलच. कालपरवा केवल जिवनतारे यांची आपली वाढदिवसानिमित्तची शुभेच्छा पोस्ट बघितली आणि अचानक आपली एक्झिट. चळवळीतील मार्गदर्शक प्रेरणादायी व्यक्तिमत्व निघून जाणे. ही आंबेडकरी चळवळीची फार मोठी हानी. सांस्कृतिक चळवळीत अगदी तरूण वयात असतांना लोकमतमध्ये आपण असतांना आम्हाला आपली वैचारिक चर्चा चळवळीत कार्य करण्याची उर्जा असायची. टपरीवरचा चहा आणि गप्पा आजही आठवतात. पण शेवटी सारे काही अनित्यच न दादा? अनिच्चावत संखारा उप्पादवय धम्मिनोज्अनंत मंगल कामना!

तक्षशीला वाघधरे

## ज्येष्ठ साहित्यिक आणि जुझारू पत्रकार

नागपूर येथील प्रखर, निर्भीड आणि तत्त्वनिष्ठ पत्रकार तसेच ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रणजीत मेश्राम यांच्या आकस्मिक निधनाने शहरासह सामाजिक, साहित्यिक आणि पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने समाजाचे मोठे आणि अपुरणीय नुकसान झाले असल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या प्रवासात नेहमीच सत्य, न्याय आणि समाजहिताच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. सत्तेच्या दबावाला वा कोणत्याही प्रलोभनाला न जुमानता त्यांनी निर्भीडपणे भूमिका मांडली. वंचित, शोषित आणि गरजू घटकांचा आवाज बनून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या लेखणीने अन्यायाविरुद्ध लढा दिला आणि जनतेच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. अत्यंत अभ्यासू विचारवंत, परखड वक्ते आणि क्रांतिकारी लेखणीचे धनी असलेले डॉ. रणजीत मेश्राम यांनी आयुष्यभर आपली लेखणी व्यवस्थेतील विसंगतींविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आणि सत्याच्या बाजूने निडरपणे चालवली. त्यांच्या विचारांत धार होती, शब्दांत ज्वाला होती आणि भूमिका नेहमीच ठाम व तत्त्वनिष्ठ असायची. त्यांनी पत्रकारिता केवळ व्यवसाय म्हणून नाही, तर सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन म्हणून जगली. साहित्य क्षेत्रातही त्यांनी आपल्या वैचारिक लेखनातून समाजमनाला विचार करायला भाग पाडले. डॉ. रणजीत मेश्राम यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल, अशीच अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रवीण बागडे

## सम्यक थिएटरतर्फे श्रद्धांजली

सम्यक थिएटरचे संयोजक नरेश साखरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रा. रणजीत मेश्राम यांनी आपल्या लेखणीतून केवळ शब्द मांडले नाहीत, तर अन्यायाविरुद्ध ठाम आवाज उठवत समाजमनाला जागृत केले. समतेच्या लढ्याला त्यांनी बौद्धिक धार देत वैचारिक चळवळीला बळकटी दिली. त्यांची भूमिका नेहमी स्पष्ट, परखड आणि तडजोड न करणारी होती. पत्रकारितेकडे त्यांनी व्यवसाय म्हणून नव्हे, तर सामाजिक बांधिलकी म्हणून पाहिले. त्यांच्या लिखाणातून विचारांची ठाम दिशा आणि सामाजिक परिवर्तनाची जाज्वल्य आस सातत्याने दिसून येत होती. या दुःखद प्रसंगी प्रा. मेश्राम यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी असून त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन अर्पण करीत असल्याची भावना नरेश साखरे संयोजक सम्यक थिएटर, नागपूर यांनी व्यक्त केली.

## कर्मठ, निष्ठावंत आणि तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्यास भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली!

आंबेडकरवादी चळवळीतील ज्येष्ठ पत्रकार, लेखक, चिंतक, प्रभावी वक्ते आणि भाष्यकार रणजीत मेश्राम यांचे निधन झाले आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आंबेडकरवादी विचारधारेच्या प्रचार-प्रसारासाठी समर्पित केले. समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी लेखणी आणि वाणी दोन्हींचा प्रभावी वापर केला. त्यांच्या जाण्याने आंबेडकरवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. या कर्मठ, निष्ठावंत आणि तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्यास भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली!

प्रीतम बुलकुंडे

## मन अत्यंत दु:खी झाले...

प्रा. रणजीत मेश्राम यांच्या निधनाची बातमीने मन अत्यंत दुःखी झाले. रणजीत मेश्राम साहेब माझे एक वेलविशर होते. त्यांची माझी दोन-तीन वेळा प्रत्यक्ष भेट झाली होती आणि दोनदा त्यांचे विचार ऐकण्याची संधीही मला लाभली. ते अत्यंत मुद्देसूद, तर्कशुद्ध आणि प्रभावीपणे आपले विचार मांडत असत. 25 डिसेंबर 2024 रोजी बहुजन सौरभ कार्यालयात आमची शेवटची भेट झाली होती. त्यांनी मला पाहताच विचारले, 'डॉक्टर वासनीक ना, दिल्लीवरचे?' त्यांच्या त्या साध्या पण आत्मीय ओळखीने मी भारावून गेलो. अल्पवयातच, अवघ्या 73-74 वर्षांच्या आसपास त्यांनी या जगाचा निरोप घेतला. ते समाजाची एक अमूल्य संपत्ती होते. त्यांच्या जाण्याने आंबेडकरी चळवळीला, डॉ. बाबासाहेबांच्या आणि बुद्धांच्या विचारांच्या प्रवाहाला मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

डॉ. के.पी. वासनीक परिवार,
नवी दिल्ली

## बरंच काही बोलायचे राहून गेले ना सर...

किती स्नेह किती स्तुती देवून गेलात शब्द रुपी आम्हाला कधीही न विसरण्यासाठी. बहुजन सौरभला भेटण्याआधी कित्येकदा तुमची भेट झाली, बोललात. पण प्रत्यक्षात मात्र अतिशय आपुलकीने विचारपुस केली ती बहुजन सौरभच्या ऑफिसला. मग त्यानंतर माझ्या मिस्टरांना माझा मित्र म्हणून तुम्ही ओळख देवू लागलात. माझी लेखणी, आमचे जगणे तुम्हांला आवडायचे. मग कुठेही तुमचे व्याख्यान असले की तुम्ही दोघेही या प्रोग्रामला आवर्जुन या असा तुमचा आग्रह असायचा. ते प्रत्येक वेळी आम्हाला शक्य नसायचे तरी प्रयत्न असायचा. येवढ्या मोठ्या गर्दीत तुम्हाला आमचा शोध असायचा. नाही उपस्थित राहाता आले तर लगेच दुसऱ्या दिवशी मॅसेज असायचा, 'तुम्ही आलात नाही.' सहज मग मी गंमतीने म्हटले, 'सर तुम्ही घरी या, नाहीतर तुम्ही आम्हाला तुमच्या घरी बोलवा. खुप गप्पा करु.' पण त्यावर तुम्ही गप्प होतात. 'तुम्हा दोघा पती पत्नी मध्ये काही तरी विशेष आहे. तुम्ही दोघेही माझे अतिशय आवडते आहात. ज्यामुळे मला खुप तुमच्याशी भेटायला बोलायला आवडते.' सरांचे हे शब्द, तुमच्या बरोबर घालवलेला वेळ, चहा, पुढे हे स्नेहरुपी बंधन गडद होत असताना, प्रामाणिकतेला प्रामाणिकतेची जाण होत असताना एकाएकी तुम्ही आमची, या समाजाची साथ सोडून निघून गेलात. मी पुन्हा तुम्हाला भेटायला येणार होती, पण आता तर श्वासच थांबला.ताही खरे वाटत नाही सर.....
वेडी आस होती मनात तुम्ही पुन्हा जागणार, बोलणार?

प्रतिभा रवी सहारे, कवयित्री

## प्रा. रणजीत मेश्राम - मोठ्या मनाचा विचारवंत

प्रा. रणजीत मेश्राम सरांचा मृत्यु झला अशी दुःखद बातमी दै. बहुजन सौरभचे संपादक संध्या राजुरकर यांच्याकडून कळली. ऐकून दुःख झाले. प्रा. रणजीत मेश्राम सर हे गेल्या काही महिण्यांपासून मस्तिष्काघातामुळे बेशुद्धावस्थेत रूग्णालयातच होते. आज आपण पाहतो की जगातील मोठे विचारवंत, लेखक व राजकीय पुढारी किंवा कोणत्याही क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती हे त्यांच्या वयाचे नव्वदी पार पाडत आहेत. अशा परिस्थितीत प्रा. रणजीत मेश्राम सर त्यांच्या वयाच्या पंच्चाहत्तरी नंतर जग सोडून जाणे म्हणजे आंबेडकरी-बहुजन समाजाची मोठी हानी होय. नागांच्या नागपूर या नगरीत होऊन गेलेल्या अतिशय मोजक्या आंबेडकरी विचारवंतांमध्ये त्यांचा समावेश होतो. ते खुल्या आणि मोठ्या मनाचे विचारवंत होते. आंबेडकरी-बहुजन समाजातून विविध क्षेत्रांमध्ये तरूण पीढीने पुढे येऊन त्या-त्या क्षेत्रात भरीव कामगिरी करावी असे ते नेहमी सांगत व अशा युवकांना ते प्रोत्साहन देत असत. नागपूरात जुन्या पीढीतील बोटावर मोजता येणाऱ्यांपैकी ते एक निर्भिड व प्रभावी वक्ते आणि विचारवंत होते. हा माझा व्यक्तिगत अनुभव आहे. त्यांच्या अकाली जाण्याने न भरून निघणारी उणीव निर्माण झाली आहे. त्यांच्या आंबेडकरी-बौद्ध चळवळीतील भरीव कामगिरीस, योगदानास चिरंतन लक्षात घेऊन त्यांना मन-हृदयातून श्रद्धांजली!

प्रा. अश्ववीर वा. गजभिये

## मन अत्यंत भावूक झाले आहे!

आज आदरणीय रणजीत मेश्राम दादा यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करताना मन अत्यंत भावूक झाले आहे. सन 1994 साली मी लोकमतच्या रंगधारा पुरवणीत 'कोर्ट कचेरी' हे कायद्याचे सदर लिहित होतो. त्या वेळी आदरणीय जगन वंजारी हे पुरवणी संपादक होते. लेखासाठी थोडेसे मानधन मिळाले की मी वर्धा रोडवरील लोकमत कार्यालयात वंजारी साहेबांना भेटण्यासाठी जात असे. त्या भेटींमध्ये रणजीत दादांची हमखास भेट व्हायची.
दादा अत्यंत उमदे, दिलदार आणि प्रोत्साहन देणारे व्यक्तिमत्त्व होते. एक तरुण वकील म्हणून ते नेहमी मला प्रोत्साहन देत. त्यांच्या बोलण्यात आत्मीयता आणि विचारांमध्ये चळवळीची जाणीव असायची. नंतर बहुजन सौरभमध्ये त्यांचे लेख मी आवडीने वाचत असे. त्यांच्या लेखनातून आंबेडकरी विचारांची स्पष्टता आणि सामाजिक बांधिलकी जाणवत असे. अचानक त्यांचे लेख येणे बंद झाले तेव्हा कळले की दादांची प्रकृती गंभीर आहे. ती बातमी ऐकून मनाला खूप वाईट वाटले. आंबेडकरी पत्रकारिता आणि सामाजिक चळवळ यासाठी रणजीत मेश्राम दादांनी दिलेले योगदान निश्चितच मोलाचे आहे. त्यांचे कार्य, विचार आणि लेखन पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत.
त्यांच्या स्मृतींना माझी विनम्र आणि भावपूर्ण आदरांजली.

अनिल वैद्य
माजी न्यायाधीश

## वैचारिक आधारस्तंभ!

पत्रकार रणजीत मेश्राम यांच्या अकाली जाण्याने सर्वांचेच मोठे नुकसान झाले आहे. आज त्यांच्या सारख्या सर्वसमावेशक, अभ्यासू आणि तत्त्वनिष्ठ व्यक्तींची समाजाला अत्यंत गरज होती. मी त्यांना माझ्या विद्यार्थी जीवनापासून एक निर्भीड पत्रकार म्हणून पाहत आले आहे. त्या काळात आम्ही विविध विद्यार्थी आंदोलनांत सक्रिय होतो. आमच्या प्रत्येक आंदोलनाकडे ते सकारात्मक दृष्टीने पाहत असत. आमच्या भूमिकेचे ते कौतुक करत, योग्य मार्गदर्शन करत आणि सातत्याने हौसला वाढवत असत. त्यांचे शब्द आम्हाला प्रेरणा देणारे असत. त्यांचे वामपंथी आंदोलनाशी तसेच कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांशी घनिष्ठ संबंध होते. कम्युनिस्ट आणि रिपब्लिकन पक्षाच्या संयुक्त आंदोलनांमध्ये आम्ही अनेकदा एकत्र काम केले. कॉमरेड कश्यप, कॉमरेड बर्धन तसेच रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांसोबत त्यांनी वैचारिक ऐक्य जपत सामाजिक न्यायासाठी लढा दिला. विचारभिन्नता असली तरी समान ध्येयासाठी एकत्र येण्याची त्यांची भूमिका आदर्शवत होती. प्रा. रणजीत मेश्राम हे केवळ पत्रकार नव्हते, तर ते चळवळीचे वैचारिक आधारस्तंभ होते. त्यांचे जाणे ही केवळ एका व्यक्तीची हानी नसून एका विचारसरणीच्या सशक्त आवाजाची पोकळी आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! लाल सलाम रणजीत मेश्राम! जय भीम!

— आशु सक्सेस

## अप्लाईड आंबेडकरवादाचा आग्रही हरवला...

रिपब्लिकन परिवारच्या एका परिषदेत ते बोलत होते बहुतेक ते 2015-16 साल असेल. बिफ बॅन झाले तरी लोक खवळून का उठले नसतील? हा त्यांनी सवाल उपस्थित केला. हा केवळ फॉर्मल समतेचा, मूलभूत अधिकाराचा मुद्दा म्हणून ते मांडत नव्हते... ते म्हणाले 'मायला लेकरांच्या तोंडच्या नश्ळ्या बंद झाल्या तरी लोक थंड आहेत!' अल्प शब्दातली सोपी आणि नेमकी वाक्ये लिहण्याची त्यांची कसोटी, हातोटी अफाट होती. ऑक्टोंबरपासूनच नॉटरिचेबल झालेल्या रणजित दादांना भेटता आले नाही. पत्रकार म्हणून आणि भारिप बहुजन महासंघाचे नेते म्हणून विदर्भात एके काळी परिणामकारक असलेले रणजित दादा नंतर नव्यांना प्रोत्साहीत करत राहिले?
रणजित दादांना अखेरचा जयभीम.....

धम्मसंगिनी










सर्व फोटो विनोद आटे





## निधन वार्ता

### अर्चना बाबुराव ढेंगरे



अर्चना ढेंगरे
०२.०३.२०२६

नागपूर : भारतीय बौद्ध महासभा नागपूर महानगर जिल्हा शाखाचे सचिव बाबुराव ढेंगरे यांच्या पत्नी अर्चना बाबुराव ढेंगरे यांचे सकाळी निधन झाले.आज दि. 2 मार्च रोजी दुपारी 5.30 वाजता त्यांचे राहते घरुन विश्व कर्मा नगर येथून निघुन अंतिम संस्कार मोक्षधाम घाट, घाट रोड नागपूर येथे करण्यात आले. त्यांचे परिवारात दोन मुले, सुन, नातवंड आणि मोठा ढेंगरे परिवार आहे.

## निधन वार्ता

### श्री. विश्वनाथ सीताराम शेळके



नागपूर : नागपुरातील फ्रेंड्स कॉलोनी येथील रहिवासी श्री. विश्वनाथ सीताराम शेळके (सध्या राहाणे -कोपरखैरणे, मुंबई), यांचे दि. 02/03/2025 रोजी सकाळी 4.45 वाजता निधन झाले. काही दिवसांपूर्वी मुंबई येथे त्यांचा दुर्दैवी अपघात झाला होता. त्यांच्या पश्चात प्रभा विश्वनाथ शेळके (पत्नी), राहुल विश्वनाथ शेळके (मुलगा), लीना राहुल शेळके (सून), महेंद्र विश्वनाथ शेळके (मुलगा), योगिता महेंद्र शेळके (सून), नातवंड व मोठा आप्तपरिवार आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648